कृषीवल
रायगड, बुधवार, दि. १८ मार्च २०२६
किंमत ४ ₹

## जीवघेणा हल्ला; आरोपीला सक्तमजुरी

**माणगाव :** माणगाव येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने अल्पवयीन मुलीवर जीवघेणा हल्ला केल्याप्रकरणी आरोपीस ६ वर्षे ७ महिने सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. ही घटना दि. २७ ऑगस्ट २०१९ रोजी सावंतकोंड येथे घडली होती. आरोपी शुभम गजानन वनारसे (रा. खडकवणे, पोलादपूर) याने पीडितेवर चाकूने वार करून गंभीर दुखापत केली होती. याप्रकरणी पोलादपूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासानंतर न्यायालयाने आरोपीस पोक्सो कायद्यान्वये दोषी ठरवत आठ हजारांचा दंडही ठोठावला.

सी साईट रिसॉर्ट (नागांव)
कुक, वेटर व हाऊसकिपींग स्टाफ पाहिजे
संपर्क : ९४२२८५६३३६
७३८५९६५८८५

### प्रलंबित मागण्यांसाठी सरकारी कर्मचाऱ्यांची निदर्शने

# संपाचा इशारा



। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

सुधारित पेन्शन योजना, अपुरे मनुष्यबळ, तसेच वाहन चालक व शिपाई भरतीवरील बंदी अशा विविध प्रलंबित प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी (दि.१६) सरकारी कर्मचारी रस्त्यावर उतरले. अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर त्यांनी शासनाविरोधात जोरदार घोषणा देत निदर्शने केली. राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे जिल्हाध्यक्ष संदीप नागे यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने कर्मचारी एकत्र आले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, सुधारित राष्ट्रीय निवृत्त वेतन योजना जाहीर करण्यात आली असली तरी तिची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या •➤ पान २ वर

### सरकारविरोधात २१ एप्रिलपासून संप

विविध मागण्यांसाठी राज्य सरकारी व निमसरकारी कर्मचारी, जिल्हा परिषद कर्मचारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, नगरपालिका, ग्रामपंचायत कर्मचारी तसेच कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या समित्यांनी यापूर्वीही अनेकदा आंदोलने केली आहेत. वॉकआऊट आंदोलन, बेमुदत साखळी उपोषण, धरणे, सत्याग्रह अशा विविध मार्गांनी शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, शासनाकडून केवळ आश्वासने देण्यात आली असून, त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेली नाही, असा आरोप संघटनांनी केला आहे. दरम्यान, मागण्यांकडे तातडीने लक्ष न दिल्यास २१ एप्रिलपासून बेमुदत संपावर जाण्याचा इशाराही कर्मचाऱ्यांनी दिला आहे

## दारू पिऊन वाहन चालविणे पडले महागात

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

वाहतूक नियमांचे उल्लंघन करत दारूच्या नशेत वाहन चालविणे अनेकांना महागात पडले असून, तब्बल ४० चालकांना न्यायालयाची पायरी चढावी लागली आहे. रायगड जिल्हा वाहतूक शाखेने जानेवारी ते फेब्रुवारी या दोन महिन्यांच्या कालावधीत ही कारवाई करत बेशिस्त वाहनचालकांना चांगलाच दणका दिला आहे.

रायगड जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरत असून, येथे दरवर्षी लाखो पर्यटक भेट देतात. समुद्रकिनारे तसेच विविध पर्यटनस्थळांचा आनंद घेण्यासाठी पर्यटकांची विशेषतः सुट्टीच्या दिवशी मोठी •➤ पान २ वर

## ‘एमएसआयडीसी’चा भोंगळ कारभार

### चुकीच्या गटारकामामुळे चौल-सागमळ्यात पुराचा धोका





। रेवदंडा । प्रतिनिधी ।

चौल-सागमळा येथे महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ (एमएसआयडीसी) यांच्या स्टॉर्म वॉटर ड्रेनेज प्रकल्पातील गंभीर त्रुटींमुळे ग्रामस्थांच्या जीवितासह मालमत्तेलाही मोठा धोका निर्माण झाला आहे. अर्धवट, चुकीच्या पद्धतीने आणि तांत्रिक निकषांकडे दुर्लक्ष करून करण्यात आलेल्या गटारकामामुळे पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होण्याची भीती व्यक्त होत असून, ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

या प्रकल्पांतर्गत गटाराचे बांधकाम एका बाजूनेच करण्यात आले असून, दुसऱ्या बाजूचे काम तसेच पूर्ण पडती (स्लोप) •➤ पान २ वर

### बंद दाराआड संगनमत?

या प्रकल्पात अनधिकृत कामे आणि बंद दाराआड निर्णय घेतले जात असल्याची चर्चा जोर धरत आहे. ठेकेदार आणि अधिकाऱ्यांमध्ये संगनमत असल्याचा संशय ग्रामस्थांकडून व्यक्त करण्यात येत असून, संपूर्ण प्रकल्पाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## ४०० निष्पापांचा बळी

### पाकिस्तानचा अफगाणिस्तानवर भ्याड हल्ला



। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

एकीकडे आखातात इराण आणि अमेरिका-इस्रायल भिडले असताना पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमध्येही जोरदार युद्ध सुरू आहे. दोन्ही बाजूंनी हल्ले-प्रतिहल्ले करण्यात येत आहेत. मंगळवारची पहाट अफगाणिस्तानसाठी भयंकर ठरली. पाकिस्तानने अफगाणिस्तानची राजधानी काबूलमधील एका व्यसनमुक्ती रुग्णालयावर भ्याड हवाईहल्ला केला. या हल्ल्यात ४०० जणांचा मृत्यू झाला असून, २५० जण जखमी झाले आहेत.

अफगाणिस्तानचे उपप्रवक्ते हमदुल्ला फितरत यांनी याविषयी माहिती दिली आहे. रात्री नऊ वाजताच्या सुमारास पाकिस्तानने एका व्यसनमुक्ती रुग्णालयावर हल्ले केले. २००० हजार खाटांचे हे मोठे रुग्णालय या हल्ल्यात उद्ध्वस्त झाले. उपचार सुरू असलेल्या अनेक रुग्णांचा यात मृत्यू झाला आहे.

तालिबानचे मुख्य प्रवक्ते जबिहुल्ला मुजाहिद यांनी या हल्ल्याचा तीव्र निषेध केला आहे. ‘पाकिस्तानी लष्करी •➤ पान २ वर

### इराणचा दुबई विमानतळावर हल्ला

**नवी दिल्ली :** अमेरिका व इस्रायलच्या चौफेर हल्ल्यांमुळे चवताळलेल्या इराणने सोमवारी पुन्हा एकदा दुबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लक्ष्य केले. इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सने दुबई विमानतळावर ड्रोन हल्ला चढवला. हल्ल्यानंतर विमानतळावर आग लागल्यामुळे काही काळ येथील उड्डाणे स्थगित करण्यात आली होती. दरम्यान, युएईच्या फुजैरा बंदरावर सलग दुसऱ्या दिवशी इराणने ड्रोन डागले. इराणने होर्मुझ सामुद्रधुनीचा ताबा घेऊन तेल व्यापाराची सर्व सूत्रे आपल्या हाती घेतल्याने डोनाल्ड ट्रम्प हतबल झाले आहेत. हा मार्ग खुला करण्यासाठी ‘नाटो’ देशांनी युद्धनौका पाठवाव्यात, असे आवाहन त्यांनी केले. मात्र, कुणीही प्रतिसाद न दिल्याने संतापलेल्या ट्रम्प यांनी दमदाटी सुरू केली आहे. ‘इराणविरोधात अमेरिकेला साथ न दिल्यास परिणाम वाईट होतील. नाटोचे भवितव्य कठीण असेल,’ अशी धमकी त्यांनी दिली आहे.

## शॉक लागून कामगाराचा मृत्यू

। महाड । प्रतिनिधी ।

महाड एमआयडीसी परिसरातील पिडीलाइट कंपनीत काम करत असताना एका तरुण कामगाराचा शॉक लागून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे औद्योगिक सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आलम हरून खान (२५, रा. आदर्श नगर, बिरवाडी) हा कंपनीत इलेक्ट्रीशियन म्हणून काम करत होता. सायंकाळच्या सुमारास चहा-नाश्ता करून कामावर परतल्यानंतर विद्युत काम करत असताना त्याला अचानक शॉक बसला आणि तो जागीच कोसळला. सहकाऱ्यांनी तात्काळ धाव घेत त्याला महाड ग्रामीण रुग्णालय •➤ पान २ वर

### जिल्ह्यात लेक लाडकी योजना | ३ कोटी २५ लाखांचा निधी वितरीत

## लाडक्या लेकींना आर्थिक आधार

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

मुलींच्या शिक्षणाला चालना देण्यासोबतच बालविवाहाला आळा घालण्यासाठी लाडक्या लेकींना आर्थिक पाठबळ देण्याचा उपक्रम जिल्हा परिषद महिला व बाल विकास विभागामार्फत राबविण्यात येत आहे. लेक लाडकी योजनेच्या माध्यमातून पहिल्या टप्प्यात ६ हजार ५०० मुलींना तब्बल ३ कोटी २५ लाख रुपयांचे अर्थसाहाय्य वितरीत करण्यात आल्याची माहिती विभागाकडून देण्यात आली आहे.

मुलींचे अठरा वर्ष पूर्ण होण्यापूर्वी विवाह लावणे, मुलगी जन्माला आल्यानंतर तिच्याकडे



दुय्यम नजरेने पाहणे, प्राथमिक शिक्षणानंतर पुढील शिक्षणासाठी पाठविण्यात येणारा अभाव अशा विविध कारणांमुळे मुलींच्या शिक्षणावर तसेच त्यांच्या बौद्धिक विकासावर मर्यादा येतात. या समस्यांवर उपाय म्हणून शासनाने पुढाकार घेत मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी ही योजना सुरू केली आहे.

मुलींच्या जन्माला प्रोत्साहन देणे, त्यांचा जन्मदर वाढविणे, मृत्यूदर कमी करणे, बालविवाह रोखणे, शाळाबाह्य मुलींचे प्रमाण शून्यावर आणणे तसेच कुपोषण कमी करणे या उद्देशाने महिला व बाल विकास विभागांतर्गत १ एप्रिल २०२३ नंतर जन्मलेल्या मुलींसाठी लेक लाडकी योजना सुरू करण्यात आली आहे.

या योजनेनुसार, मुलीच्या जन्मावेळी ५ हजार रुपये, पहिलीत प्रवेश घेतल्यावर ६ हजार रुपये, सहावीत गेल्यावर ७ हजार रुपये, अकरावीत प्रवेश घेतल्यावर ८ हजार रुपये आणि अठरा वर्ष पूर्ण झाल्यावर ७५ हजार रुपये असा •➤ पान २ वर

लाभार्थी कुटुंबाकडे पिवळे किंवा केशरी शिधापत्रिका असणे आवश्यक. १ एप्रिल २०२३ किंवा त्यानंतर जन्मलेल्या एक किंवा दोन मुलींनाच योजनेचा लाभ लागू. एक मुलगा व एक मुलगी असल्यास मुलीलाही योजनेचा लाभ. पहिल्या अपत्यासाठी तिसऱ्या हप्त्यावेळी व दुसऱ्या अपत्यासाठी दुसऱ्या हप्त्यावेळी कुटुंब नियोजन प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १ लाखांपेक्षा जास्त नसावे. लाभार्थी मुलगी व तिच्या मातेसोबत संयुक्त बँक खाते असणे आवश्यक; पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत सादर करणे बंधनकारक. अंतिम लाभ घेण्यासाठी मुलीचा विवाह झालेला नसावा.



## पान १ वरून

### संपाचा इशारा

अटी, नियम, अधिसूचना व परिपत्रके अद्याप काढण्यात आलेली नाहीत. ही योजना १ मार्च २०२४ पासून लागू करण्यात आली आहे. मात्र, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शनबाबतचे भवितव्य अजूनही अनिश्चितच आहे. इतकेच नव्हे, तर अनेकांना तात्पुरते निवृत्ती वेतनदेखील मिळालेले नाही. याशिवाय, अपुऱ्या मनुष्यबळामुळे कार्यरत कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण पडत आहे. पदोन्नतीसारख्या सेवाविषयक लाभांपासून अनेक ज्येष्ठ कर्मचारी वंचित राहात आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून मंजूर पदांवर काम करूनही त्यांना योग्य लाभ मिळत नसल्याने आर्थिक शोषण होत असल्याची भावना कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे.

रिक्त पदे भरण्याचा प्रश्नदेखील अद्याप प्रलंबितच आहे. वयोमर्यादेच्या अटींमुळे अनेक पात्र उमेदवार सेवेतून बाहेर पडत आहेत. देशातील इतर अनेक राज्यांमध्ये सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करण्यात आले असताना, महाराष्ट्रात याबाबतचा निर्णय अद्याप प्रलंबित आहे. तसेच, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या अंशतः अनुदानित शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा मुद्दाही दीर्घकाळ प्रलंबित आहे. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठीची १०:२०:३० सेवांतर्गत प्रगती योजना यांसारखे अनेक महत्त्वाचे प्रश्न लाल फितीत अडकून पडले आहेत.

चतुर्थ श्रेणी कर्मचारी व वाहन चालक भरतीवर घालण्यात आलेली बंदी अव्यवहार्य असल्याचे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. विविध विभागांतील दैनंदिन कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी या धोरणाचा पुनर्विचार करणे गरजेचे असल्याची मागणी यावेळी करण्यात आली. या सर्व मागण्यांसाठी राज्य सरकारी व निमसरकारी कर्मचारी, जिल्हा परिषद कर्मचारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, नगरपालिका, ग्रामपंचायत कर्मचारी तसेच कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या समित्यांनी यापूर्वीही अनेकदा आंदोलने केली आहेत. वॉकआऊट आंदोलन, बेमुदत साखळी उपोषण, धरणे, सत्याग्रह अशा विविध मार्गांनी शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, शासनाकडून केवळ आश्वासने देण्यात आली असून, त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेली नाही, असा आरोप संघटनांनी केला आहे.

यामुळे संतप्त झालेल्या कर्मचाऱ्यांनी मंगळवारी (दि.१७) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने केली. शासनाविरोधात घोषणाबाजी करत आपला रोष व्यक्त करण्यात आला. त्यानंतर निवासी जिल्हाधिकारी संदेश शिर्के यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. दरम्यान, मागण्यांकडे तातडीने लक्ष न दिल्यास २१ एप्रिलपासून बेमुदत संपावर जाण्याचा इशाराही कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

### 'एमएसआयडीसी'चा भोंगळ कारभार

करण्यात येणार नसल्याची माहिती स्थानिकांना देण्यात येत आहे. त्यामुळे पावसाचे पाणी योग्य दिशेने वाहून जाण्याऐवजी उलट घरांकडे वळण्याचा धोका निर्माण झाला आहे.राम मंदिराजवळील 'संपन्न' हॉटेलकडे जाणाऱ्या मार्गाखालील गटार कमी उंचीचे असून, खालचा सिमेंट कॉंक्रिटचा कोबा अधिक उंच करण्यात आला आहे. परिणामी, पाण्याचा निचरा न होता ते उलट दिशेने वाहून थेट घरांमध्ये घुसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच, संपूर्ण बांधकामात लेव्हलमध्ये मोठ्या प्रमाणात चढ-उतार असून, काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

या दोषपूर्ण कामामुळे स्थानिकांच्या बागायतींना मोठा धोका निर्माण झाला आहे. अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह शेती व बागायतींवर अवलंबून असल्याने ते प्रचंड चिंतेत आहेत. परिस्थिती इतकी गंभीर आहे की, ग्रामस्थ ''जगो या मरो'' अशा अवस्थेत असल्याची भावना व्यक्त करत आहेत. कॉन्ट्रॅक्टरवर विश्वास उरलेला नसल्याचेही ग्रामस्थ स्पष्टपणे सांगत आहेत. ज्या ठिकाणी काम पूर्ण झाले आहे, तेथे संबंधितांना फायदा करून देण्यात आला असून, इतरांना दुर्लक्षित केले जात असल्याची चर्चा स्थानिकांमध्ये रंगली आहे.

**पावसाळ्यात संकट अटळ?**

डोंगरमाथ्यावरून मोठ्या वेगाने येणारे पावसाचे पाणी योग्य निचरा न झाल्यास थेट घरांमध्ये शिरण्याची भीती आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान, बागायतींचे नुकसान तसेच जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या संभाव्य आपत्तीबाबत 'जबाबदार कोण?' असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

**जनतेची ठाम मागणी**

या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. एमएसआयडीसीचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी या गंभीर प्रकरणात तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी जोर धरत आहे. अन्यथा पावसाळ्यात उद्भवणाऱ्या संभाव्य दुर्घटनांसाठी शासनालाच जबाबदार धरले जाईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.मला या कामाबाबत कोणतीही माहिती नाही. कृपया मला याबाबत काहीही विचारू नका. सध्या कामदेखील बंद आहे.

**– मुर्गन, प्रोजेक्ट इन्चार्ज, एमएमआयडीसी**

हे काम पूर्णपणे चुकीच्या पद्धतीने केले जात आहे. गटाराची एक बाजूच बांधली असून, दुसरी बाजू अपूर्ण आहे, त्यामुळे पावसाचे पाणी आमच्या घरात घुसण्याची भीती आहे. आम्ही वारंवार सांगूनही कोणी ऐकून घेत नाही. पावसाळ्यात काही अनर्थ झाला, तर त्याला जबाबदार कोण?

**– सूर्यकांत पाटील, ग्रामस्थ, सागमळा**

### ४०० निष्पापांचा बळी

राजवटीने पुन्हा एकदा हवाई हद्दीचे उल्लंघन करून रुग्णालयांवर हल्ले केले आहेत. हा मानवतेविरुद्धचा गुन्हा आहे,' अशी जळजळीत टीका त्यांनी केली आहे.दरम्यान, पाकिस्तानने हॉस्पिटलवर हल्ला केल्याचे वृत्त नाकारले आहे. या आरोपांना कसलाही आधार नसल्याचे माहिती प्रसारण मंत्री अताउल्ला तरार यांनी म्हटले आहे. आपण फक्त तालिबानच्या लष्करी तळांना, दारूगोळ्याच्या साठ्यांना लक्ष्य केल्याचा दावा त्यांनी केला आहे.

### लाडक्या लेकींना आर्थिक आधार

टप्प्याटप्प्याने लाभ दिला जातो. अशा प्रकारे एका लाभार्थी मुलीला एकूण १ लाख १ हजार रुपयांचा निधी देण्यात येणार आहे.

रायगड जिल्हा परिषद महिला व बाल विकास विभागामार्फत या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून, पहिल्या टप्प्यातील ५ हजार रुपयांप्रमाणे ६ हजार ५०० मुलींच्या खात्यात एकूण ३ कोटी २५ लाख रुपयांचा निधी जमा करण्यात आला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील लाडक्या लेकींना आर्थिक आधार मिळाला असल्याची माहिती जिल्हा कार्यक्रम अधिकारी निर्मला कुचिक यांनी दिली.

### शॉक लागून कामगारा मृत्यू

येथे दाखल केले, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

याप्रकरणी जीवन माने पुढील तपास करत असून, मृत्यूचे नेमके कारण अद्याप गुलदस्त्यात आहे. विशेष म्हणजे, संबंधित कामगार ज्या ठेकेदारामार्फत काम करत होता त्या कंपनीचे नावही अद्याप स्पष्ट झालेले नाही. या घटनेनंतर महाड एमआयडीसी परिसरात चर्चेला उधाण आले असून, कामगार सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

### दारू पिऊन वाहन चालविणे पडले महागात

गर्दी होत असते. विविध राज्यांतील पर्यटकांसह स्थानिक नागरिकदेखील मोठ्या प्रमाणात या ठिकाणी ये-जा करत असतात. मात्र, काही वाहनचालकांकडून वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन केले जात असल्याचे चित्र दिसून येते. हेल्मेटचा वापर न करणे, अतिवेगाने वाहन चालविणे, वाहनात जादा प्रवासी घेणे, परवाना नसताना वाहन चालविणे, तसेच दारू पिऊन वाहन चालविणे अशा प्रकारच्या नियमभंगाच्या घटना सातत्याने आढळून येतात.या पार्श्वभूमीवर जिल्हा वाहतूक शाखेकडून दररोज विशेष मोहिमा राबवून बेशिस्त चालकांवर कारवाई केली जाते. विशेषतः दारू पिऊन वाहन चालविणाऱ्या चालकांविरोधात कठोर पावले उचलली जात असून, त्यांना न्यायालयात हजर करण्यात येत आहे.

जानेवारी ते फेब्रुवारी या कालावधीत अशा ४० चालकांविरोधात कारवाई करण्यात आली असून, सर्वांना न्यायालयात हजर करण्यात आले आहे. या कारवाईत स्थानिकांसह बाहेरून आलेल्या पर्यटकांचाही समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. वाहतूक पोलिसांच्या या कारवाईमुळे मद्यधुंद चालकांवर आळा बसण्यास मदत होत असल्याचे चित्र आहे. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांविरोधात दररोज नियमित कारवाई केली जात आहे. विशेषतः दारूच्या नशेत वाहन चालविणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करून त्यांना न्यायालयात हजर केले जात आहे. आतापर्यंत ४० चालकांवर अशी कारवाई करण्यात आली आहे. मद्यधुंद अवस्थेत वाहन चालविल्यास अपघात होण्याची शक्यता अधिक असते. संभाव्य अपघात टाळण्यासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी ही कारवाई करण्यात येत आहे.

**– सरिता चव्हाण, पोलीस निरीक्षक, जिल्हा वाहतूक शाखा, रायगड**


**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खाली परीशिष्टात नमुद केलेली जमीन मिळकत संदर्भीत जमीन मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अजित यशवंत पाटील, रा. मु. वायशेत, पो. नवगांव, ता.अलिबाग, जि. रायगड, यांचे कडून कायम स्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविले असून तशी बोलणी माझे अशिल व विद्यमान मालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| तुडाळ ता. अलिबाग | ३४/४ | वरकस ०-२०-०० <br> पोट खराब ०-०१-०० <br> एकूण ०-२१-०० | ०.४७ |

सदर मिळकती पैकी क्षेत्र ००-०१-०७ हे. आर. इतके क्षेत्र व त्या मिळकती मधिल ग्रुप ग्रामपंचायत थळ कार्यालयीन दप्तरी नोंद असलेले ४८०.१८ चौ.फूट (४४.६१चौ.मी.) ची घर मिळकत क्र. ५१३

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक यांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलांचे लाभात खरेदीखत करून देणार आहेत. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही गहाण, दान, भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षिस, पोटगी, मृत्यूपत्र अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत कळवाव्यात.

येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे. असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग सही/-
दिनांक : १७/०३/२०२६ **ॲड. जयेश मोतीराम पाटील**

**जाहीर सुचना**

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली बिनशेती मिळकत ही सौ. निलीमा अविनाश चिटणीस, रा. पुणे, यांचे मालकी हक्काची व ताबे वहीवाटीची आहे. विद्यमान मालकांचे सदर मिळकतीबाबत आमच्या अशिलांसोबत व्यवहाराची बोलणी चालू आहे. सदर मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतची खात्री विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेली आहे. त्यामुळे सदर मिळकतीचे कायदेशिर मालकी हक्काबाबतचे टायटल ओपिनियन (Title Verification) व शोध प्रमाणपत्र देण्याबाबत आम्हांस सांगितलेले आहे. त्यानुसार सदर मिळकतीचे विद्यमान मालकांना कायदेशिर पणे योग्य हक्क असलेबाबत अगर सदर सौ. निलीमा अविनाश चिटणीस, यांचे व्यतिरिक्त सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही गहाण, दान, ताबा, बँक बोजा, लेखी व तोंडी करार, अटॅचमेन्ट, लिज, लिन, विसारपावती, साठेखत, खरेदी करार, कुळ हक्क, पोटगी हक्क, बक्षिस व वारसा वा मुखत्यार पत्र, वहिवाटीचा हक्क वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर अस्सल व मूळ कागदपत्रांनिशी आमची खात्री पटवून द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हिल्ला हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीबाबतचा कायदेशिर मालक हक्काबाबतचे प्रमाणपत्र देतील. त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| वरसोली, ता. अलिबाग. | १६६/१९०/१९६/१९७/१९८/१८५ | ५-४५-०० एकूण | ५४-५० |
| वरसोली, ता. अलिबाग. | १६६/१९०/१९६/१९७/१९८/१८८ | ४-९५-०० एकूण | ४९-५० |

सदर बिनशेती भूखंड जमिन मिळकती व त्या अंतर्गत असणाऱ्या ग्रामपंचायत वरसोली कडील मालमत्ता क्र. १५६१ अ, क्षेत्र ५५३ चौ. फूट व मालमत्ता क्र. १५६१ ब, क्षेत्र ३२३ चौ. फूट ह्या घर मिळकतीसह.

येणेप्रमाणे मिळकतींचे मालकी हक्काबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध केली असे.
अलिबाग,
दिनांक : १७/०३/२०२६ सही/-
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग- रायगड.
खरेदीदारांचे वकील

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - सायडोंगर, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.-आर.-पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| मैथिली महेंद्र भगत | ४३ | १ | ०-२८-०० | ० | २५ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही/ -
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे, **ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, मो. नं. ९१५८२७७७२८
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१ दिनांक :- १८/०३/२०२६

**जाहीर नोटिस**

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल पराग शर्मा, राहणार-नवी मुंबई, हे खालील वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतीच्या विद्यमान मालक नारायण श्रीपत भगत, विद्यमान मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे - माणगाव बुद्रुक, ता- सुधागड, जि- रायगड**

| गट नंबर | क्षेत्र हे. आर | आकार |
|---|---|---|
| १९८ | एकूण क्षेत्र ०-३९-३० | १-६२ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी पैकी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (७) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण - पाली सुधागड सही /-
दि. १८/०३/२०२६ **ॲडव्होकेट. तुषार गणेश कानडे**
**कार्यालय-कळंब रोड कॉर्नर, जवळ हॉटेल अन्नपूर्णा,**
**जांभुळपाडा, तालुका सुधागड,, जिल्हा रायगड पिन - ४१०२०५**
**मोबाईल नंबर ९१६८८०१०४८**


# पेणमध्ये बाईकचोर पोलिसांच्या जाळ्यात

**। पेण । प्रतिनिधी ।**



पेण पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन ठिकाणावरुन स्कुटी चोरीची घटना घडली होती. या गुन्ह्याचा तपास सुरु असताना पेण पोलिसांनी राजेंद्र नथुराम किळंजे ऊर्फ अबु (रा. नागोठणे) याला दोन ॲक्टीव्हा स्कुटी चोरल्याच्या आरोपाखाली अटक केली आहे.

पेण पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण कक्षाने केलेल्या तपासात त्याने दोन्ही गुन्हांची कबुली दिली आहे. त्याच्याकडून चोरीला गेलेल्या दोन्ही स्कुटी जप्त करण्यात आल्या आहेत. यामध्ये एक लाल रंगाची होंडा कंपनीची ॲक्टीव्हा स्कुटी (क्र.एम.एच ०६/सी.बी/१०८४) अंदाजे रक्कम २० हजार, तर एक निळ्या रंगाची टिव्हीएस कंपनीची ज्युपीटर स्कुटी (क्र.एम.एच.०६/सी.के/७४४२) अंदाजे २५ हजार जप्त करण्यात आली.

पोलीस अधीक्षक आंचल दलाल आणि अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे यांच्या मार्गदर्शनाखाली पेण पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण कक्षातील अधिकारी आणि अंमलदारांनी ही कामगिरी बजावली आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल, पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या सूचनेप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण कक्षातील अधिकारी सहा. पोलीस उपनिरीक्षक सुनील चव्हाण, सहा. पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील, पोलीस हवालदार प्रकाश कोकरे, अजिंक्य म्हात्रे, सचिन व्हसकोटी, सुशांत भोईर, अमोल म्हात्रे, गोविंद तलवारे, संदीप शिंगाडे यांनी तपास केले.


**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेल्या फ्लॅट/सदनिकेचे मिळकतीचे मुळ मालक कै. गणेश एकनाथ भारंबे आणि श्रीम. संजीवनी गणेश भारंबे यांनी मे. पोद्दार डेव्हलोपर्स लि तर्फे कंपनी सेक्रेटरी जयशंकर मेनन यांचे कु.मु. श्री. सुभाष शांताराम बंदरकर यांचेकडून मौजे गारपोली ता. कर्जत जि. रायगड येथील सर्व्हे नंबर ६६/२/अ, ६३/२/ब, ६३/२/क, ६३/२/ड, ६३/२/इ, ६३/५, ६४/० या वरील समृद्धी कॉम्प्लेक्स बिल्डींग नंबर ए ३१ पहिला मजला, सदनिका नंबर १०२ क्षेत्र २९५ चौ. फूट कारपेट ही मिळकत करारनामा दुय्यम निबंधक कार्यालय कर्जत येथे नोंदणीकृत दस्त नंबर ३४९७/२०१० अन्वये दिनांक १९/०५/२०१० रोजी नोंदवून विकत घेतली होती.

कै. गणेश एकनाथ भारंबे यांचे निधन हे ०४/०५/२०२१ रोजी गणपती हॉस्पिटल मुरबाड जि. ठाणे येथे निधन झाले आहे. त्यांस वारस मुलगा श्री. पंकज गणेश भारंबे आणि पत्नी श्रीम. संजीवनी गणेश भारंबे असे एकूण दोनच वारस आहेत. सदरचे फ्लॅट/सदनिका १०२ ही मिळकत आमचे अशिल यांना कायम स्वरूपी करारनामा या दस्ताने विकत देण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिलांचे बरोबर झालेली आहेत.

तरी फ्लॅट/सदनिका मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट ताबा, वहीवाट, बयाणा, पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षीस, मृत्यूपत्र, दान, जप्ती, लिज, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, भारतातील कोणत्याही कोर्टाचे केसेस व मनाईहुकूम, महसुल कार्यालयातील केसेस, करारनामा व इतर कोणतेही हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार वकील यांच्या नमुद केलेल्या कार्यालयाचे पत्त्यावर आपल्या हरकती लेखी पुराव्यासह देण्यात यावे. दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत आली तर ती हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही तसेच आमचे अशिल सदरची मिळकतीचा खरेदीचा व्यवहार करतील याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

कर्जत सही/-
तारीख १८/०३/२०२६ **ॲड. जगदिश पांडुरंग कराळे**
कार्यालय : गाळा नंबर १०, पंकज रेसिडेन्सी,
साई हॉस्पिटल जवळ, आगरी समाज हॉल शेजारी,
धामोते, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१.
मो. नं. ८३६९२१७३१३

अर्जदार तर्फे ॲड. संजय द. म्हात्रे

**जाहीर नोटीस**

**नि. ८/ड**

अलिबाग येथील मे. जिल्हा न्यायाधीश रायगड यांचे न्यायालयात
दिवाणी चौकशी अर्ज क्रमांक ८३/२०२५

श्रीमती नयना नयन थळे — अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की अर्जदार हिने गार्डीयन्स ॲन्ड वॉर्डस ॲक्ट १८९० चे कलम ७ प्रमाणे तिची अज्ञान मुलगी कु. मुग्धा नयन थळे हिचा मौजे सुरेखार, ता.अलिबाग, जि. रायगड येथे गट नं. १९, एकुण क्षेत्र ०-११-६० हे. आर., आकार रू. ०.३९ रू. पैसे मधील चि. सेवा हिच्या अविभक्त हिश्याचे पालक म्हणून नियुक्त केल्याचे जाहीर करणेकरीता आणि कलम २९ अन्वये कु. मुग्धा नयन थळे हिचा सदरहू मिळकतीमधील अविभक्त हिस्सा, मालकीहक्काची विक्री इतर सह मालकांसह नियोजित खरेदीदार यांचे लाभांत करण्याकरीता परवानगी मिळणेकामी तिची जनक आई या नात्याने अर्ज दाखल केला आहे.

ज्या कोणाचा वर नमुद मिळकतीमध्ये हक्क, हितसंबंध आहे अथवा वरील मिळकतीबाबत अर्जदार यांना कु. मुग्धा हिचे पालक/पालनकर्ते म्हणून नियुक्त करून जाहीर करण्यास आणि मौजे सुरेखार, ता. अलिबाग, जि. रायगड येथे गट नं. १९, एकूण क्षेत्र ०-११-६० हे.आर., आकार रू. ०.३९ रू. पैसे या मिळकतीमधील कै. नयन कृष्णा थळे याचे कायदेशीर वारस म्हणून अविभक्त हिश्याची विक्री इतर सह मालकांसह नियोजित खरेदीदाराचे लाभांत करण्यास हरकत उपस्थित करण्यांची आहे अशा व्यक्तींनी दिनांक १३/०४/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता मे. न्यायालयासमोर उपस्थित राहून त्याबाबतचे आपले लेखी म्हणणे, हरकत सादर करावी.

उपरोक्त मुदतीत कोणाचाही कसलीही हरकत न आल्यास अर्जदार यांना कु. मुग्धा हिचे सहमालकीचे मौजे सुरेखार, ता. अलिबाग, जि. रायगड येथे गट नं. १९, एकूण क्षेत्र ०-११-६० हे. आर.आकार,०.३९ आकार रू.पैसे मधील या मिळकतीबाबत पालक/पालनकर्ते म्हणून नियुक्त करून जाहीर केले जाईल आणि सदर मिळकती मधील कु. मुग्धा हिच्या अविभक्त हिश्याची विक्री नियोजित खरेदीदाराचे लाभांत करण्याची परवानगी देण्यात येईल हे सर्वांस कळावे.

दि. ४/०३/२०२६ आज रोजी माझ्या सहिनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले.

सही — कनिष्ठ लिपीक, जिल्हा न्यायालय, रायगड अलिबाग
कोर्टाचा शिक्का
सही — अधिक्षक जिल्हा न्यायालय, रायगड अलिबाग

**ग्रुपग्रामपंचायत चेंढरे, ता.अलिबाग**
**जि. रायगड**
**जाहीर नोटीस** **दि. १७/३/२०२६**
जा.क्र. २०४/२०२६

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६० नुसार १६ अ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणासंबंधाने ग्रामपंचायत चेंढरेस प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रामपंचायत चेंढरे कडे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसूलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन ग्रामपंचायत दप्तरी याची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | प्रभाग क्रमांक | मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे वर्णन | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | ४ | १९८३/१२ | बालाजी पाल्म्स | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला ६३० चौ. फूट | मनोज गोल्ला | प्रिती प्रशांत ठाकूर |
| २ | २ | १११९/११ | सुमंगल सोसा. | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला ५२५ चौ. फूट | अशोक भगवानराव बंड | महेश बाळू भोसले |
| ३ | ५ | ५५२/१५ | गायत्री सोसा. | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला ५०८ चौ. फूट | जयराम लक्ष्मण पाटील | समीरा संदेश पालकर संदेश गजानन पालकर |
| ४ | ५ | १११२/८ | स्वामी दर्शन सोसा. | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम १ रा मजला ५८१ चौ. फूट | हेमचंद्र दत्तोबा तावडे | यतिन हेमचंद्र तावडे |
| ५ | ६ | २१५८ | सेंट मेरी शाळेजवळ | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम १८७२ चौ. फूट | अनंत महादेव कोळगावकर | गितेश अनंत कोळगावकर |
| ६ | ५ | ५५२/११ | गायत्री सोसा. | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला ५४२ चौ. फूट | पांडुरंग मोरेश्वर ठाकूर | प्रिती पांडुरंग ठाकूर प्रणव पांडुरंग ठाकूर |
| ७ | ४ | १७७९/३ | मधु रेसिडेन्सी | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ६३३ चौ. फूट | शरद वामन चेवले अनिता शरद चेवले | दिनेश शरद चेवले |
| ८ | ४ | १७७९/८ | मधु रेसिडेन्सी | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम २ मजला ६३३ चौ. फूट | शरद वामन चेवले अनिता शरद चेवले | राकेश शरद चेवले |
| ९ | ४ | १७५३/८ | अमर सॉलिटेअर | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला ६३४ चौ. फूट | शरद वामन चेवले अनिता शरद चेवले | उमेश शरद चेवले |
| १० | ४ | १७५३/५ | अमर सॉलिटेअर | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला ६३४ चौ. फूट | शरद वामन चेवले अनिता शरद चेवले | उमेश शरद चेवले |
| ११ | २ | २०७३/१८ | सावित्री हेरिटेज | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ५ मजला ४४५ चौ. फूट | मंजुला पारसमल जैन | अलका हरिश्चंद्र शेलार मृणाल प्रसाद पाटील साक्षी स्वप्निल केणी |
| १२ | २ | १९६३ | विद्यानगर पश्चिम चेंढरे | आर.सी.सी. बांधकाम घर ९१८ चौ. फूट | मोरेश्वर शांताराम कुंभार | मोरेश्वर शांताराम कुंभार किर्ती मोरेश्वर कुंभार |
| १३ | ४ | १९९३/७ | ट्रॅनक्युक आयकॉन सोसा. | आर.सी.सी. बांधकाम दुसरा मजला सदनिका ३३२ चौ. फूट | प्रमोद रामकृष्ण खंडागळे | समिक्षा प्रमोद खंडागळे |
| १४ | ४ | १६८१/७ | सिगल सोसा. | आर.सी.सी. बांधकाम दुसरा मजला सदनिका ४७५ चौ. फूट | पार्वती महादेव सगर मीनाक्षी राजू सगर | प्रतिक शिवदास रहाटे |

सही/-
**श्री. निलेश लक्ष्मण गावंड**
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत चेंढरे, ता. अलिबाग

# श्रीवर्धन नगरपालिकेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह

## ‘लाईव्ह प्रक्षेपण’ प्रस्ताव अजेंड्यावरून गायब

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन नगरपालिकेच्या कामकाजातील पारदर्शकतेच्या मुद्यावरून शहरात मोठा राजकीय संघर्ष उभा राहिला आहे. सभागृहातील चर्चेचे ‘लाईव्ह प्रक्षेपण’ करण्याचा प्रस्ताव आगामी सर्वसाधारण सभेच्या अजेंड्यावरून वगळण्यात आल्याने विरोधकांनी सत्ताधारी आणि प्रशासनावर तीव्र टीका सुरू केली आहे. हा वाद केवळ एका प्रस्तावापुरता मर्यादित न राहता आता तो थेट लोकशाही मूल्ये, पारदर्शकता आणि प्रशासनाच्या विश्वासार्हतेशी जोडला गेला आहे.

नगरपालिकेतील सभागृहाचे कामकाज फेसबुक, यूट्यूब किंवा अधिकृत संकेतस्थळावरून थेट प्रसारित करण्याचा प्रस्ताव शिवसेना गटनेते देवेंद्र भुसाणे यांनी काही दिवसांपूर्वी लेखी स्वरूपात प्रशासनाकडे सादर केला होता. या प्रस्तावामागील उद्देश स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजात नागरिकांचा थेट सहभाग वाढवणे, निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता आणणे आणि जनतेचा प्रशासनावरचा विश्वास अधिक दृढ करणे हा होता. मात्र, हा प्रस्ताव आगामी सभेच्या अधिकृत अजेंड्यातून पूर्णपणे वगळण्यात आल्याने संशय आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या निर्णयामुळे विरोधक आक्रमक झाले असून, त्यांनी सत्ताधाऱ्यांवर जाणीवपूर्वक माहिती दडपण्याचा आरोप केला आहे.

देवेंद्र भुसाणे यांनी या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना स्पष्ट शब्दांत म्हटले की, नगरपालिका ही जनतेची संस्था आहे. सभागृहात काय घडते, कोणते निर्णय घेतले जातात, कोणते प्रश्न उपस्थित होतात, हे नागरिकांना समजणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे. लाईव्ह प्रक्षेपणाचा प्रस्ताव वगळणे



### राजकीय वातावरण तापले

**श्रीवर्धनमधील नागरिकांमध्येही या मुद्द्यावरून चर्चा रंगली आहे. काही नागरिकांनी प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, ‘लाईव्ह प्रक्षेपणामुळे प्रशासन अधिक जबाबदार राहील आणि भ्रष्टाचाराला आळा बसेल, असे मत व्यक्त केले आहे. तर काही जणांनी या निर्णयामागे राजकीय हेतू असल्याचा संशय व्यक्त केला आहे. या वादामुळे श्रीवर्धनमधील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, आगामी सर्वसाधारण सभेत या मुद्द्यावर जोरदार गदारोळ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**

म्हणजे जनतेच्या डोळ्यांवर पट्टी बांधण्याचा प्रयत्न आहे. शहरातील राजकीय वर्तुळात या निर्णयामागील कारणांबाबत विविध तर्कवितर्क लावले जात आहेत. काहींच्या मते, सभागृहातील चर्चा आणि निर्णय प्रक्रिया थेट जनतेसमोर आल्यास अनेक संवेदनशील मुद्दे उघड होऊ शकतात. त्यामुळे सत्ताधाऱ्यांची अडचण वाढू शकते. त्यामुळेच हा प्रस्ताव जाणीवपूर्वक दाबण्यात आला, असा आरोप त्यांनी केला जात आहे.

दरम्यान, प्रशासनाकडून या विषयावर अद्याप अधिकृत स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. त्यामुळे संशय अधिकच बळावला आहे. नागरिकांमध्येही या निर्णयाविरोधात नाराजी पसरली असून, ‘आमच्या पैशातून चालणाऱ्या संस्थेचे कामकाज आम्हाला पाहण्याचा पूर्ण अधिकार आहे’, अशी भावना व्यक्त केली जात आहे. माहितीचा अधिकार कायदा २००५ तसेच महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ नुसार नागरिकांना प्रशासनाच्या कामकाजाची माहिती मिळवण्याचा स्पष्ट अधिकार आहे. डिजिटल युगात अनेक महानगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्था त्यांच्या सभांचे थेट प्रक्षेपण करत असताना, श्रीवर्धनमध्ये मात्र असा प्रस्ताव अजेंड्यावरून वगळला जाणे हे मागासलेपणाचे लक्षण असल्याची टीका होत आहे. या प्रकरणामुळे सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये तीव्र संघर्षाची शक्यता निर्माण झाली आहे. विरोधी पक्षाने सभागृहात हा मुद्दा जोरदारपणे उपस्थित करण्याचा इशारा दिला असून, आवश्यक असल्यास जनआंदोलन छेडण्याची तयारीही दर्शवली आहे. ‘हा केवळ एका प्रस्तावाचा प्रश्न नाही, तर लोकशाही वाचवण्याचा लढा आहे, असे भुसाणे यांनी स्पष्ट केले. त्यामुळे सत्ताधारी या आरोपांना कशा प्रकारे उत्तर देतात आणि ‘लाईव्ह प्रक्षेपण’ प्रस्तावाबाबत पुढे काय निर्णय घेतला जातो, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

एकूणच, ‘लाईव्ह प्रक्षेपण’ या मुद्याने श्रीवर्धन नगरपालिकेतील कारभाराच्या पारदर्शकतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. हा वाद केवळ एका प्रशासकीय निर्णयापुरता मर्यादित राहील की तो व्यापक राजकीय संघर्षात परिवर्तित होईल, हे येणाऱ्या काळात स्पष्ट होणार आहे. मात्र, या प्रकरणाने स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पारदर्शकता आणि जबाबदारी या मुद्द्यांवर नव्याने चर्चा सुरू झाली आहे, हे निश्चित.

# पाणंद शेतरस्ता अतिक्रमणाबाबत निवेदन




| चिरनेर | प्रतिनिधी |

खारपाडा गावातील भगतनगर महामार्ग ते घोटमालवाडीकडे जाणारा पाणंद शेतरस्ता हा पिढ्यानपिढ्यांचा वडिलोपार्जित शेतरस्ता आहे. येथील शेतकऱ्यांचा शेतीकडे जाणारा हा एकमेव शेतरस्ता असून सर्व्हे नंबर २८/३ मध्ये बळीराम पाटील व त्यांच्या तीन भावांचे एकत्रित घर क्रमांक ५५९/१ ते ४ हे बेकायदा बांधकाम आहे. त्यांनी कोणत्याही प्रकारची शासनाची पूर्वपरवानगी न घेता बिनशेती न करता पाणंद शेतरस्त्यात नवीन बांधकाम करून अतिक्रमण केले आहे. त्यामुळे हा पाणंद शेतरस्ता अतिशय अरुंद झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना ट्रॅक्टर, ट्रॉली व नांगर या वाहनांची शेतीच्या मशागतीसाठी आणि उत्पादनाची ने-आण करण्यासाठी मोठी अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांना आपली भातशेती लागवडीखाली आणता येत नाही.

येथील शेतकऱ्यांनी पाटील भावांविरोधात पेण तहसील कोर्टात दावा दाखल केला होता. त्याचा निकाल दि.९ जानेवारी रोजी शेतकऱ्यांच्या बाजूने लागला. मात्र, २ महिने पूर्ण होऊन देखील संबंधित अतिक्रमणावर कोणत्याही प्रकारची कारवाई केली गेली नाही. तरी संबंधित पाणंद शेतरस्त्यावरील अतिक्रमणावर ग्रामविकास अधिकाऱ्यांकडून लवकरात लवकर कारवाई करून शेतकऱ्यांची होणारी गैरसोय दूर करण्याची मागणी शेतकऱ्यांनी पेणचे गटविकास अधिकारी गजानन लेंडी, पंचायत समिती सभापती स्मिता पाटील, उपसभापती संजय डंगर यांना प्रत्यक्षात भेटून लेखी निवेदन दिले आहे. यावेळी गटविकास अधिकारी यांनी लवकरात लवकर याबाबत योग्य ती कारवाई करून शेतकऱ्यांचा पाणंद शेतरस्ता मोकळा करून देण्याचे आश्वासन दिले आहे.

# चौल-आग्राव रस्ता संथ गतीने

| रेवदंडा | प्रतिनिधी |

चौल-आग्राव रस्ता नुतनीकरणास प्रारंभ झाला असून काही ठिकाणी क्रॉकिटीकरण सुद्धा झाले आहे. मात्र, या कामासाठी अनेक ठिकाणी रस्ता खोदण्यात आला आहे. तसेच, हे काम अत्यंत संथ गतीने होत असून चौल-आग्राव पंचक्रोशीतील विद्यार्थी, ग्रामस्थ व प्रवासीवर्गाचे बेहाल होत आहेत. एकूणच दोन वर्षांपुर्वी मंजूर झालेले काम ठेकेदार वेळेत पुर्ण न करता मनमानी करत असल्याची संप्तत प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.



चौल-आग्राव रस्ताला निधी मंजूर होऊन दोन वर्षे उलटली. गेल्या वर्षी जानेवारीमध्ये हे काम सुरू करण्याची ठेकेदाराला निविदा प्राप्त झाली होती. परंतु, तेव्हाही काम सुरू करण्यात आले नाही. पर्यायी रस्ता नसल्याने ऐन पावसाळ्यात काम पुर्ण करता आले नाही. त्यामुळे दिवाळी पुर्वी सुरू झालेले चौल-आग्राव क्रॉकिटीकरणाचा रस्ता ६ महिने उलटून गेले तरी अद्यापी पुर्ण झालेला नाही. परिणामी आग्राव-अलिबाग एस.टी. बसेस बंद असल्याने विद्यार्थीवर्गाचे खुप हाल होत आहेत. तसेच, ग्रामस्थ व प्रवासीवर्ग यांचेही बेहाल झाले आहेत. ठेकेदाराने ठिकठिकाणी रस्त्यातच मटेरीयल टाकले असल्याने दुचाकी व तिनचाकी वाहनांच्या अपघाताला ते निमत्रंण ठरत आहे. एकूणच ठेकेदाराच्या मनमानीने चौल-आग्राव रस्ता नुतनीकरण संथ गतीने होत असून संबधीत खात्याने लक्ष्य देऊन त्या ठेकेदारास कामाच्या पुर्ततेचा कालावधी जाहीर करावा. अन्यथा त्या ठेकेदारास काळ्या यादीत टाकून हे काम काढून घेण्यात यावे, अशी मागणी पंचक्रोशीतून सर्व थरातून केली जात आहे.

# बनावट साहित्य प्रकरणी गुन्हा दाखल

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

९ लाख ८७ हजार ५२३ रुपयांचे विविध कंपन्यांचे बनावट साहित्य ताब्यात बाळगून साठेबाजी केल्याप्रकरणी राजेश रघु चाम्रिया यांच्या विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कामोठे पोलीस ठाणे हद्दीत नौपाडा गाव या ठिकाणी ईआयपीआर इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या विविध कंपनीच्या लोगो आणि ट्रेडमार्क चिन्हाचा वापर करून बनावट उत्पादने साठा करून विक्रीसाठी ठेवले असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार कंपनीचे अधिकारी आणि पोलीस नौपाडा येथे गेले. त्यावेळी राजेश चामरिया याने गोडाऊन उघडले असता त्या ठिकाणी ९ लाख ८७ हजार ५२३ रुपयांचे विविध कंपन्यांचा बनावट माल सापडून आला.






# धर्म स्वातंत्र्याच्या नावाने

या देशात ८५ टक्के लोक हिंदू आहेत. शेकडो वर्षे इथे मुस्लिम राजांनी राज्य केले. तरीही प्रजा हिंदूच राहिली. आता तर केंद्रात आणि बहुसंख्य राज्यांमध्ये हिंदुवादी सरकारे आहेत. पंतप्रधानांपासून त्यांचे तमाम नेते मुस्लिमांना येताजाता टोकत आणि ठोकत असतात. पोलिस दले, प्रशासन या हिंदुवाद्यांच्या हातातच आहे. तरीही मोठ्या प्रमाणात धर्मांतरे होतील व हिंदुंची संख्या कमी होईल अशी भीती या मंडळींना वाटते. किंवा, खरे तर असा बागुलबुवा दाखवून साध्याभोळ्या हिंदू लोकांना घाबरवण्याचे आणि मुस्लिम, ख्रिश्चन इत्यादींच्या विरोधात एक होण्याचे आवाहन हे हिंदूवादी लोक करीत असतात. आपण सत्तेत आल्यामुळे हिंदूंच्या हिताच्या गोष्टी कशा करीत आहोत हे दाखवणे हेही त्यांच्यासाठी आवश्यक असते. राज्य विधानसभेने सोमवारी संमत केलेले धर्मांतरविरोधी विधेयक हे त्याचेच उदाहरण आहे. या कायद्याचा उद्देश जबरदस्तीची धर्मांतरे रोखणे असा असला तरी त्याचे नाव मात्र धर्मस्वातंत्र्य कायदा २०२६ असे आहे. आता हे विधेयक विधानपरिषदेत मांडला जाईल व तिथेही बहुदा ते झटपट संमत होईल. विशेषतः ठाकरे शिवसेनेचा या विधेयकाला पाठिंबा असल्याने त्याच्या मंजुरीसाठी अडचण येणार नाही. या प्रस्तावित कायद्यानुसार, कोणत्याही प्रकारे जबरदस्तीने धर्मांतर करणे किंवा लग्नासाठी वा नंतर धर्म बदलायला भाग पाडणे इत्यादींना कठोर शिक्षा आहेत. सरकार काहीही सांगत असले तरी या कायद्याचा मुख्य हेतू हा दोन विभिन्न धर्मीयांमध्ये सहजासहजी लग्ने होऊ न देणे असाच आहे. त्यातही मुस्लिम व हिंदू अशी लग्ने होऊ नयेत ही भाजपच्या हिंदूवादी पुढाऱ्यांची काळजी आहे. हेच पुढारी गेले चार वर्षांपासून लव्ह जिहादची कावकाव करीत आहेत. मुस्लिम तरुण व हिंदू तरुणी यांच्यातले लग्न म्हणजे लव्ह जिहाद असतो, हिंदू तरुणीला फसवून जाळ्यात अडकवले जाते, धर्मांतरासाठी तसेच भावी काळात मुस्लिम प्रजा वाढवण्यासाठी या लग्नांचा मार्ग अवलंबला जातो असा या हिंदूवाद्यांचा दावा आहे. पण तो मुस्लिमांबाबत सरसकट विष पसरवणारा व कोणताही आधार नसलेला आहे.

## साठ दिवसांची नोटीस हवी कशाला?

या देशात सुमारे १३ टक्के मुस्लिम राहतात. तरीही मुस्लिम व हिंदू यांच्यातील लग्नांचे प्रमाण अत्यंत कमी आहे. मध्यंतरी केरळ स्टोरीज नावाचा सिनेमा आला होता. केरळमधील शेकडो हिंदू मुलींचे अपहरण व छळ केला गेला असे त्याच्या जाहिरातीत म्हटले होते. प्रत्यक्षात अशी केवळ एकच केस घडलेली होती व तीही अपवादात्मक होती असे दिसून आले. महाराष्ट्रात मंगलप्रभात लोढा वगैरे उटपटांग मंत्र्यांनी पुढाकार घेऊन राज्यभरात लव्ह जिहादविरुध्द मोर्चे काढले होते. त्यावेळी सरकारकडे लव्ह जिहादच्या एक लाख तक्रारी आल्या असल्याचे खोटेच सांगण्यात आले होते. प्रत्यक्षात केवळ ४०२ तक्रारी नोंदल्या गेल्याचे उघड झाले. यातही बहुतांश तक्रारींमध्ये काहीही दम नव्हता. वैयक्तिक राग काढण्यासाठी किंवा राजकीय हेतूने यातील बऱ्याचशा तक्रारी केल्या गेल्या होत्या हे उघड झाले. हिंदू व मुस्लिम मुलामुलींनी प्रेमात पडून लग्न केले तर त्यात लगेच धर्माचा गैरहेतू पाहण्याची गरज नाही. इतर कोणत्याही लग्नांमध्ये निर्माण होतात तसे तंटे किंवा विसंवाद याही लग्नांमध्ये निर्माण होऊ शकतात. ते मिटवताही येतात. मात्र हिंदूवादी लोक अशा विसंवादांना धार्मिक रंग देतात व त्याचे राजकीयीकरण करतात. त्यामुळे मग मुलगा व मुलगी अशा दोन्ही बाजू बचावात्मक पवित्र्यात जातात. राज्य सरकारच्या नव्या कायद्यातील अनेक तरतुदींमुळे लग्न किंवा प्रेम यासारख्या खासगी गोष्टींचे अनावश्यक सार्वजनिकीकरण होणार आहे. शिवाय त्याचा लाभ घेण्यासाठी राजकीय मंडळींना त्यात घुसण्याची सोयच जणू हा कायदा करून देणार आहे. उदाहरणार्थ, एखादी व्यक्ती धर्मांतर करणार असेल तर तिला किमान साठ दिवस याबाबत जाहीर नोटीस द्यावी लागणार आहे व आपण धर्मांतर का करणार आहोत याची कारणे द्यावी लागणार आहेत. वास्तविक धर्म ही खासगी बाब आहे. तो बदलणे इत्यादी गोष्टी या पूर्णपणे व्यक्तीच्या इच्छेवर अवलंबून असायला हव्यात. पण एकदा ६० दिवसांची नोटीस दिली की त्यात बजरंग दल वगैरे मंडळी घुसणार व समजा व्यक्ती मुस्लिम किंवा ख्रिश्चन धर्म स्वीकारत असेल तर त्याला जीव नकोसा करणार. त्या व्यक्तीवर दबाव आहे, तिला पैसे किंवा अन्य आमिष दिले जात आहे असा दावा करणार. याची मिडियात प्रसिध्दी झाली की काय खरे आणि काय खोटे हे ठरवणे कठीण होऊन बसणार.


## कथित धर्मरक्षकांवर कारवाई हवी

असे प्रकार देशभर यापूर्वी अनेकदा घडले आहेत. महाराष्ट्रातही अशा घटना अधूनमधून घडत असतात. त्यातही हा लग्नाचा मासला असेल व मुलगा मुस्लिम असेल तर त्यात हटकून मुलाला दहशतवादी संघटनाचा सदस्य ठरवण्याचे काम केले जाते. अलिकडे इंदापूरमध्ये अशाच घडलेल्या प्रकरणात संबंधित मुलीने आरंभी आपण स्वखुषीने मुस्लिम मुलासोबत गेल्याचे सांगितले. पण नंतर त्यात गोपीचंद पडळकर वगैरे भाजपचे नामचीन आमदार उतरल्यावर वातावरण इतके गढूळ झाले की मुलीने व कुटुंबियांना आपला जबाब फिरवणे भाग पडले. काल विधानसभेत या ठरावाला विरोध करताना जितेंद्र आव्हाड यांनी हे धर्मस्वातंत्र्य नव्हे तर धर्मावर बंधने घालणारे विधेयक आहे असे त्याचे वर्णन केले. रईस शेख यांनी लव्ह जिहादच्या किती तक्रारी सरकारकडे आल्या व त्यांतून पुढे काय निष्कर्ष निघाले याचा अहवाल सादर करण्याची मागणी केली. या संदर्भात राज्य पोलिस महासंचालकांची एक समिती गेल्या वर्षी स्थापन झाली होती. तिचे पुढे काय झाले हे सरकारने सांगायला हवे. पण सरकारला केवळ असले कायदे आणून आपण हिंदूसाठी काहीतरी करतो आहोत हे दाखवायचे आहे. दुर्दैवाने ज्या झटपट व शिताफीने हे धर्मस्वातंत्र्यासारखे कायदे संमत केले जातात त्यामुळे राज्यात धर्मांतरांचे जणू पेव फुटले असा फालतूचा समज तयार होतो. दुसरीकडे असले कायदे करण्यात तत्परता दाखवणारे सरकार महिलांना राखीव जागा देण्याबाबत किंवा तत्सम मुद्द्यांवर वर्षानुवर्षे कायदे करण्याचे टाळते. देशात अनेक राज्यांमध्ये १९६८ पासून असे कायदे आहेत. ईशान्येकडील राज्ये किंवा ओरिसा, झारखंड, छत्तीसगढसारखी आदिवासीबहुल राज्ये यामध्ये ख्रिश्चन धर्मांतरांचे प्रकार अनेकदा घडतात. पण त्यातही जबरदस्ती असल्याचे सिध्द करणे कठीण झालेले आहे. मुस्लिमांशी संबंधित प्रकरणांमध्ये मात्र हमखास दबाव आणून धर्मांतर केले जात असणार असे गृहित धरले जाते. त्याच मानसिकतेतून हा कायदा केला गेला आहे. आता गोरक्षणाच्या नावावर जसे ठिकठिकाणी गुंड उभे राहतात व बाजाराला गुरे विकायला निघाली तरी त्यांच्या मालकांकडून खंडणी गोळा करतात तसे या तथाकथित धर्मस्वातंत्र्य कायद्यातून घडू नये. गृहखाते फडणवीसांकडेच आहे. त्यांनी असल्या गुंडांवर कडक कारवाई होईल याची काळजी घ्यावी.

विचार

# 'अँथ्रोपिक एआय'चा भारतावरील प्रभाव

***अँथ्रोपिकसारख्या कृत्रिम बुद्धिमत्ता साधनाने माहिती तंत्रज्ञान सेवा कंपन्यांच्या कामाच्या स्वरूपात मोठा बदल केला आहे. यामुळे कामाची गती वाढून खर्च कमी झाला आहे आणि सेवा गुणवत्ता सुधारली आहे. परंतु रोजगार धोका, डेटा सुरक्षितता, अवलंबित्व आणि चुकीची माहिती यासारखी आव्हानेही समोर आली आहेत. या नव्या तंत्रज्ञानाचा समतोल आणि सुयोग्य वापर करून त्याचे फायदे मिळवणे आवश्यक आहे.***




डॉ. दीपक शिकारपूर

आधुनिक काळात जगभरातच नव्हे तर भारतासाठीही माहिती-तंत्रज्ञान सर्वात महत्त्वाचे व्यवसाय क्षेत्र बनले आहे. आजचे युग पूर्णपणे डिजिटल झाले आहे. तंत्रज्ञानात्मक प्रगतीचा वेग सध्याच चक्रावून टाकणारा झाला आहे. माहिती (डेटा), कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशिअल इंटेलिजन्स) आणि कनेक्टिव्हिटी या तीन घटकांचा समावेश असलेली चौथी औद्योगिक क्रांती आता जगात घडू लागली आहे. माहितीने जागतिक अर्थव्यवस्थेत आता तेलाची जागा घेतली आहे. प्रत्येक वस्तू, उपकरण 'स्मार्ट' असणे आज चैन नसून गरज होत चालली आहे. यंत्रमानव आणि मानव यांच्यामधील दरी आगामी शतकात कमी कमी होणार आहे. आपल्या आसपासच्या डिजिटल विश्वाची सतत उत्क्रांती होत राहणार आहे. त्यामुळेच या तंत्राचे व्यावहारिक उपयोगदेखील वाढताना दिसणार आहेत. लवकरच आपल्या जीवनशैलीमध्ये आणि दिनक्रमामध्ये इतक्या सहजपणे हे तंत्र मिसळणार आहे, की एखाद्या वस्तूबाबत अशा प्रकारची अतिरिक्त माहिती मिळणे आपण गृहीतच धरणार आहोत. आरोग्य, प्रवास, खरेदी अशा सर्व पैलूंना हे तंत्र स्पर्श करणार आहे. माहितीचे महाजाल आणि तिचे विकेंद्रीकरण हे याचे मूलतत्त्व असणार आहे. या तंत्रानुसार संबंधित यंत्रणेला दिल्या जाणाऱ्या मर्यादित निर्णयक्षमतेमुळेदेखील एकंदर चित्रावर मोठा आणि मनोरंजक परिणाम दिसू लागेल. आपले जीवन कळत-नकळत तंत्रावलंबी (स्मार्ट) बनेल.

कृत्रिम बुद्धिमत्तेने (एआय) आपल्या जगात क्रांतिकारक बदल घडवून आणले आहेत. या तंत्रज्ञानाचा वापर आता आपल्या दैनंदिन जीवनाच्या प्रत्येक पैलूला स्पर्श करत आहे. भविष्यात एआय अधिकाधिक शक्तिशाली आणि प्रभावी होत जाईल. त्यामुळे अनेक नवीन संधी आणि आव्हाने निर्माण होतील. विविध तंत्रज्ञान आधारित कामे, सॉफ्टवेअर विकास, प्रणाली समाकलन, डिजिटल सेवा, ग्राहक सहाय्य, डेटा विश्लेषण आणि इतर अनेक सेवा भारतातील कंपन्या जगभरात पुरवतात. या व्यापक सेवाक्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता या तंत्रज्ञानाने मोठा बदल घडवून आणला असून विशेषतः 'अँथ्रोपिक' नावाचे नवीन बुद्धिमत्ता साधन भारतातील कंपन्यांसमोर संधी आणि आव्हाने दोन्ही उभे करत आहे. अँथ्रोपिक हे एक भाषिक समज, लेखन निर्मिती, विश्लेषण आणि स्वयंचलित निर्णय प्रक्रियेत माणसासारखे सहाय्य करू शकणारे कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित टूल आहे. यामुळे कंपन्यांना कामे जलद, अचूक आणि कमी खर्चात करता येतात, परंतु त्याचे सर्वच परिणाम सकारात्मक नसून त्यामुळे काही समस्या आणि आव्हानेही निर्माण होत आहेत. अँथ्रोपिक ही एक कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रणाली आहे. ती माहितीचा अभ्यास करून भाषेच्या स्वरूपात उत्तर तयार करते, दस्तावेज लिहीते, संशोधनाची माहिती देते, डेटा विश्लेषण करते आणि अनेक तांत्रिक तसेच व्यावसायिक कामे करु शकते. हे साधन मानवी भाषेतील विविध पैलूंना समजून घेऊ शकते तसेच विचारपूर्वक उत्तरे देऊ शकते. त्यामुळे ते विविध क्षेत्रात उपयोगी पडते.

भारतातील माहिती तंत्रज्ञ सेवा कंपन्या जगभरातल्या ग्राहकांना सॉफ्टवेअर, प्रणाली सल्ला, ग्राहक सहाय्य आणि इतर सेवा पुरवताना कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर वाढवतात. अँथ्रोपिकमुळे यापैकी बऱ्याच कार्यप्रणाली बदलत आहेत. अँथ्रोपिकमुळे अनेक सामान्य आणि वारंवार करावी लागणारी कोडींग (प्रोग्रामिंग), दस्तावेज तयार करणे, ग्राहकांच्या प्रश्नांची त्वरित उत्तरे देणे, डेटा वर्गीकरण आणि विश्लेषण यासारखी कामे आता स्वयंचलित केली जाऊ शकतात. यामुळे कामाची गती वाढते आणि कर्मचारी अधिक कौशल्यात्मक आणि जटील कामांवर लक्ष केंद्रित करू शकतात. भारतीय सेवा कंपन्यांना जागतिक स्तरावर स्पर्धा करायची असल्याने जलद आणि कमी किमतीच्या सेवा देणे आवश्यक बनले आहे. अँथ्रोपिकसारख्या बुद्धिमत्ता साधनाचा वापर केल्याने त्यांना जलद सेवा पुरवता येतात. त्यामुळे जागतिक ग्राहकांना आकर्षित करणे सोपे होते. स्वयंचलित साधनांचा वापर केल्याने कामाला लागणारा वेळ आणि खर्च कमी होतात. त्यामुळे कमी वेळेत जास्त कामे हाताळता येतात. कंपन्यांच्या नफ्यात वाढ होते आणि ते अधिक प्रोजेक्ट्स स्वीकारू शकतात. आता आपण अँथ्रोपिकच्या वापरामुळे भारतीय कंपन्यांना काय फायदे मिळतात, हे तपशीलात पाहू या. अँथ्रोपिकमुळे पुन्हा पुन्हा करावी लागणारी कामे टाळता येतात आणि मानवी चुका कमी होतात. त्यामुळे काम अधिक सुस्पष्ट आणि वेळेत पूर्ण होऊ शकते. याचा प्रत्यक्ष फायदा म्हणजे कंपनी अधिक प्रकल्प स्वीकारू शकते आणि जास्त नफा मिळवू शकते. अँथ्रोपिकमुळे कंपन्या स्वयंचलित ग्राहक सहाय्य, बुद्धिमत्ता आधारित सल्लागार सेवा, अनुवाद आणि भाषांतर सेवा, डेटा विश्लेषण आणि भविष्यातील अंदाज अशा सेवांचा विस्तार करू शकतात. यामुळे कंपन्यांचे ग्राहकक्षेत्र विस्तृत होते. साधे काम स्वयंचलित केल्यावर कुशल मनुष्यबळ अधिक सर्जनशील आणि महत्त्वाच्या कामांवर लक्ष केंद्रित करू शकते. यामुळे कर्मचारी ओढवून ठेवण्याची क्षमता वाढते आणि उच्च गुणवत्तेची सेवा मिळते. मानवी चुका कमी झाल्यामुळे आणि काम अधिक परिणामकारक झाल्यामुळे सेवा गुणवत्ता वाढते. ग्राहकांचे समाधान वाढते आणि दीर्घकालीन व्यावसायिक नाती निर्माण होतात. अँथ्रोपिकमुळे अनेक फायदे मिळतात, परंतु त्याचे काही तोटेही आहेत. या तोट्यांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. स्वयंचलनामुळे काही साध्या कामांची गरज कमी झाली आहे. यामुळे काही नोकऱ्यांची संख्या कमी होण्याची शक्यता आहे. विशेषतः अद्याप तंत्रज्ञान कौशल्य न लाभलेल्यांना नवी संधी शोधणे कठीण होऊ शकते. पूर्वी कंपन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात दस्तावेज तयार करणे, सॉफ्टवेअर चाचणी, तांत्रिक सहाय्य इत्यादी कामे करणाऱ्यांचे काम आता अँथ्रोपिकमधील स्वयंचलनामुळे कमी झाले आहे. त्यामुळे कोडर्सनी अधिक कौशल्य, तांत्रिक ज्ञान आणि सर्जनशील विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. पर्यायाने नव्या कौशल्यासाठी प्रशिक्षण आवश्यक झाले आहे. त्यामुळे कोडिंगची अनेक कामे कमी होणार आहेत. साहजिकच जगभरातील आयटी उद्योगाला याचा फटका बसला. सर्व कंपन्यांचे शेअर्स खाली आले. भविष्यात या उद्योगाची आर्थिक स्थिती खालावेल, अशी गुंतवणूकदारांना भीती आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता टूल्स मोठ्या प्रमाणात माहिती साठवतात आणि वापरतात. योग्य सुरक्षितता उपाय नसतील तर खाजगी माहिती, ग्राहक डेटा आणि संवेदनशील माहिती बाहेर जाऊ शकते. त्यामुळे कंपन्यांनी डेटा सुरक्षितता आणि गोपनीयता नियमांची कडक अंमलबजावणी करणे अत्यावश्यक आहे. अँथ्रोपिकसारख्या साधनावर खूप अवलंबून राहणे काही वेळा कंपनीच्या अंतर्गत बुद्धिमत्तेची वाढ थांबवू शकते. यामुळे कर्मचाऱ्यांची स्वतःची सर्जनशीलता आणि निर्णयक्षमता कमी होऊ शकते. अँथ्रोपिक कधी कधी चुकीची माहिती देऊ शकते किंवा तांत्रिक त्रुटी निर्माण होऊ शकतात. अशी माहिती ग्राहकाला दिली गेली तर कंपनीची प्रतिष्ठा आणि व्यावहारिक परिणाम उलट होऊ शकतात. अँथ्रोपिकचा योग्य उपयोग करून फायदे वाढवण्यासाठी आणि तोटे कमी करण्यासाठी काही उपाय महत्वाचे ठरू शकतात. नवीन तंत्रज्ञानाबद्दल कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आयोजित करणे आवश्यक आहे. त्यामुळे कर्मचारी नवीन साधनांशी जुळवून घेऊ शकतात आणि त्यांचा सर्वोत्तम उपयोग करू शकतात. डेटा सुरक्षिततेसाठी कडक नियम आणि प्रक्रिया बनवणे आवश्यक आहे. तसेच ग्राहकांची संवेदनशील माहिती योग्य प्रकारे सांभाळायला हवी. स्वयंचलित साधनांचा उपयोग करताना मानवी निरीक्षण आणि निर्णयाची गरज कायम ठेवणे आवश्यक आहे. यामुळे चुका कमी होतात आणि उत्कृष्ट परिणाम मिळतो. भारतीय कंपन्यांनी जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी नवीन धोरणे बनवणे आवश्यक आहे. बुद्धिमत्ता साधनांचा अधिक प्रभावी उपयोग करून नव्या सेवा, उत्पादनांचा विस्तार करणे आवश्यक आहे.

अँथ्रोपिकसारख्या कृत्रिम बुद्धिमत्ता साधनाने माहिती-तंत्रज्ञान सेवा कंपन्यांच्या कामाच्या स्वरूपात मोठा बदल केला आहे. यामुळे कामाची गती वाढली आहे, खर्च कमी झाला आहे आणि सेवा गुणवत्ता सुधारली आहे. परंतु रोजगार धोका, डेटा सुरक्षितता, अवलंबित्व आणि चुकीची माहिती यासारखी आव्हानेही समोर आली आहेत. भारतीय माहिती तंत्रज्ञान सेवा कंपन्यांनी या नव्या तंत्रज्ञानाचा समतोल आणि सुयोग्य वापर करून फायदे मिळवणे आवश्यक आहे. कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, सुरक्षितता नियम, मानव आणि तंत्रज्ञानाचा समन्वय यावर भर दिल्यास अँथ्रोपिकचा उपयोग कंपनीच्या वाढीस आणि विकासाला मोठ्या प्रमाणात मदत करू शकतो. या प्रकारे भारतीय सेवाक्षेत्रावर अँथ्रोपिक साधनाचा प्रभाव सकारात्मक पण विचारपूर्वक असल्यास टिकणारा आणि फायदेशीर ठरू शकतो.

deepak@deepakshikarpur.com

**(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)**

चर्चा आजची

# युद्धामुळे सामान्यांचा कोंडमारा!




राकेश लोहार

सध्या जागतिक पातळीवर सुरू असलेल्या अमेरिका-इस्त्रायल आणि इराण संघर्षाचे परिणाम केवळ रणांगणापुरते मर्यादित राहिलेले नाहीत, तर त्याचे गंभीर पडसाद सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनावर उमटताना दिसत आहेत. या युद्धाचा सर्वात मोठा फटका जर कुणाला बसत असेल, तर तो सामान्य नागरिकांना. कारण, त्यांच्याकडे ना पर्याय असतो, ना निर्णयक्षमता.

खरं तर, युद्ध कोणालाही नको हवं असतं. कारण, युद्ध म्हणजे केवळ दोन देशांमधील संघर्ष नसतो, तर तो लाखो निरपराध लोकांच्या आयुष्याशी खेळ करणारा असतो. अनेक संसार उद्ध्वस्त होतात, कुटुंबातील कर्ते सदस्य गमावले जातात आणि अनेकांना आपल्या प्रियजनांना कायमचे मुकावे लागते. सार्वजनिक मालमत्तेची मोठ्या प्रमाणावर हानी होते आणि विकासाची गती मंदावते, तरी युद्ध हवेय का?

युद्धामुळे उद्भवलेली गंभीर समस्या म्हणजे गॅसटंचाई. घरगुती गॅस मिळत नसल्यामुळे नागरिकांना पहाटेपासून रांगा लावाव्या लागत आहेत. देशभरत हे विदारक दृश्य आहे. या रांगा केवळ लांब नाहीत, तर त्यात असहाय्यतेचा आणि संतापाचाही सूर दिसतो. गॅसचा तुटवडा असल्यामुळेच तो सर्वांना मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. मात्र, याच वेळी 'गॅस मुबलक आहे' असे सांगितले जात असल्याने सामान्यांच्या मनात संभ्रम आणि नाराजी निर्माण होत आहे. जर खरोखरच गॅस मुबलक प्रमाणात उपलब्ध असता, तर लोकांना एजन्सीबाहेर तासन्‌तास उभं राहावं लागलं नसतं. वास्तव आणि सांगितले जाणारे चित्र यात फरक दिसतो, तेव्हा सामान्य माणूस अधिकच अस्वस्थ होतो. ही केवळ टंचाई नसून, व्यवस्थापनातील कमतरतेचंही द्योतक आहे. परंतु, आजही सरकार खरं काय ते सांगायला तयार नाही.

याच पार्श्वभूमीवर एक महत्त्वाचा मुद्दा लक्षात येतो. कोरोना लॉकडाऊन काळात जसे लोक शहरातून गावाकडे परतले, तसेच आज गॅसटंचाईमुळे अनेक कुटुंबांना पुन्हा चुलीवर स्वयंपाक करण्याची वेळ आली आहे. आधुनिकतेकडून पारंपरिकतेकडे हा प्रवास हा प्रगतीचा नाही, तर परिस्थितीने लादलेला बदल आहे. ज्यांनी वर्षानुवर्षे गॅसवर स्वयंपाक केला, त्यांनाही आता लाकूड, शेगडी आणि चुलीचा आधार घ्यावा लागत आहे. हे चित्र केवळ ग्रामीण भागातच नाही, तर काही शहरी भागातही दिसू लागले आहे, ही बाब अधिकच चिंताजनक आहे.

युद्धामुळे पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. पण, त्याचबरोबर योग्य नियोजन आणि पारदर्शकतेचा अभाव ही परिस्थिती अधिक गंभीर बनवत आहे. लोकांमध्ये ''आपल्याला खरं काय आहे ते सांगितलं जातंय का?'' असा प्रश्न निर्माण होत आहे.

युद्धाचा परिणाम उद्योगक्षेत्रावरही गंभीर आहे. लघु व मध्यम उद्योगांना कच्च्या मालाचा तुटवडा भासत आहे. आयात अडकल्यामुळे उत्पादन ठप्प होत आहे. 'घराघरातील उद्योग' म्हणून ओळखले जाणारे छोटे व्यवसाय; जसे की कुटीर उद्योग, अन्नप्रक्रिया, शिवणकाम यांना याचा मोठा फटका बसत आहे. कच्चा माल महाग झाला आहे, तर तयार माल विक्रीसाठी बाजारपेठही मर्यादित झाली आहे. यामुळे अनेक उद्योग बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. उत्पादन कमी झाल्यामुळे कामगारांना काम मिळत नाही. परिणामी, रोजगाराचा प्रश्न गंभीर झाला असून, बेरोजगारी वाढतेय आणि त्याचा परिणाम पुन्हा सामान्य कुटुंबांवरच होतो.

दरम्यान, वाहतूक खर्च वाढल्यामुळे जीवनावश्यक वस्तू महाग झाल्या आहेत. सामान्य कुटुंबाचे बजेट कोलमडून पडत आहे. शेती क्षेत्रावरही या परिस्थितीचा मोठा परिणाम झाला आहे. शेतमाल बंदरांमध्ये अडकून पडल्यामुळे नुकसान होत आहे. आधीच हवामान बदलामुळे त्रस्त असलेला शेतकरी आता या संकटामुळे अधिकच हतबल झाला आहे.

या संपूर्ण परिस्थितीत सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, पारदर्शकता आणि योग्य नियोजन. लोकांना खरी परिस्थिती सांगितली गेली, तर ते त्यानुसार तयारी करू शकतात. अन्यथा असंतोष वाढतो. शेवटी, युद्ध कुठेही झाले तरी त्याची झळ सर्वसामान्यांनाच बसते. त्यामुळे शांतता आणि स्थैर्य यालाच प्राधान्य देणे गरजेचे आहे. म्हणूनच युद्ध थांबल्यास आज जी सर्वसामान्यांची प्रत्येक गोष्ट मिळविण्यासाठी धावपळ उडाली आहे, त्याला कुठेतरी स्थिरता लाभेल. गॅस व इंधन पुरवठा सुरळीत होऊन टंचाई कमी होईल, जीवनावश्यक वस्तूंच्या किमती स्थिर राहतील आणि महागाई आटोक्यात येईल. आजची वस्तुस्थिती अशी आहे की, जागतिक संघर्षाचा परिणाम आता थेट सामान्यांच्या आयुष्यावर जाणवू लागला आहे. त्यामुळे हे कुठेतरी थांबणे गरजेचे आहे.

लोकसंसद

## दहावी-बारावी परीक्षेत कॉपी प्रकारामुळे अभ्यासू विद्यार्थ्यांवर अन्याय

शिक्षण विभागाकडून इयत्ता दहावी व बारावी परीक्षेसाठी कॉपीमुक्त अभियान व कडक उपाययोजना करण्यात आल्या होत्या. परीक्षा केंद्रावर सी सी टी व्ही व ड्रोन च्या माध्यमातून कडक टेहळणी देखील केली जात आहे. असे असतानाही अनेक केंद्रावर कॉपी प्रकरणे आढळून आली आहेत. केंद्रावर छापे टाकून अनेक कॉपी बहाद्दरांना पकडण्यात आले आहे. अनेक ठिकाणी शिक्षका वर कारवाई केली जात आहे. विविध जिल्ह्यात सुमारे १०३ कर्मचाऱ्यावर कारवाई केली असून त्यांना निलंबित केले आहे ही बातमी नुकतीच वाचण्यात आली. शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात शिक्षकच कॉपीला साहाय्य करतात हे खरे तर आश्चर्यकारक आहे. विद्यार्थी सुद्धा बनावट प्रवेशपत्रावर प्रवेश मिळविणे, मोबाईलचा वापर करणे असे प्रकार करून कॉपी प्रकरणाला सहाय्य करत आहेत शिक्षणक्षेत्रातली ही बाब सर्वांना विचार करायला लावणारी आहे. अशा कॉपी प्रकारामुळे अभ्यासू विद्यार्थ्यांवर अन्याय होतो. आजच सांगोला येथील भूगोल विषयाच्या प्रश्नपत्रिका कुलूप तोडून प्रश्नपत्रिका चोरीस गेल्याची बातमी कळली. इयत्ता दहावीचा भूगोल विषयाचा पेपर उद्या आहे असे कळते आता यामुळे इयत्ता दहावीची भूगोलाची परीक्षा पुढे ढकलली जाणार का? यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सुमारे चार पाच दशकांपूर्वी अशी कॉपी प्रकरणे होत नव्हती. पण अलिकडच्या काळात अनेक प्रकारच्या उपाय योजना करूनही कॉपी प्रकरणे होत आहेत सरकारने यावर विचार करून हे प्रकार होणार नाहीत व त्यावर कडक उपाययोजना कशा करता येतील याचा विचार करणे जरूर आहे.

**– शांताराम वाघ, पुणे**

दिनविशेष

# जागतिक पुनर्वापर दिन

दरवर्षी १८ मार्च हा दिवस जगभरात 'जागतिक पुनर्वापर दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस पुनर्वापराचा एक उपक्रम म्हणून सुरू झाला आणि आता तो एक जागतिक कार्यक्रम व सुट्टी बनला आहे. हा दिवस प्रत्येक व्यक्तीला, आपण कचरा कसा निर्माण करतो याचा विचार करण्यासाठी वेळ काढण्यास आणि त्यातील काही कचरा जगातील कचराभूमींवरून पुनर्वापर केंद्रांकडे वळवण्यासाठी प्रयत्न करण्यास प्रोत्साहित करतो.

जगभरात दरवर्षी १.४ अब्ज टनांपेक्षा जास्त कचरा निर्माण होतो आणि २०२६ पर्यंत हा आकडा २.३ अब्ज टनांपेक्षा जास्त होण्याची शक्यता आहे. केवळ हा आकडाच लोकांना हा सण साजरा करण्यास प्रवृत्त करायला हवा, जेणेकरून ते त्यांच्या कचऱ्याकडे वेगळ्या दृष्टीने पाहू लागतील आणि अधिक पुनर्वापर करण्याचे मार्ग शोधतील. जागतिक पुनर्वापर दिनाची स्थापना सर्वप्रथम २०१८ मध्ये 'ग्लोबल रिसायक्लिंग फाउंडेशन' या ना-नफा संस्थेद्वारे करण्यात आली, जिचा उद्देश पुनर्वापराचे महत्त्व वाढवणे आणि शाश्वत विकासाला पाठिंबा देणे हा आहे. या दिवसाला संयुक्त राष्ट्रांनी मान्यता दिली असून तो जगभरात साजरा केला जातो. पहिला जागतिक पुनर्वापर दिन १८ मार्च २०१८ रोजी साजरा करण्यात आला आणि तेव्हापासून तो एक वार्षिक कार्यक्रम बनला आहे, जो पुनर्वापर आणि शाश्वत पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी व्यक्ती, संस्था आणि सरकारांना एकत्र आणतो. हा दिवस पर्यावरणावरील कचऱ्याच्या परिणामाबद्दल जागरूकता निर्माण करण्याची आणि भावी पिढ्यांसाठी पृथ्वीचे संरक्षण करण्याकरिता लोकांना कृती करण्यास प्रोत्साहित करण्याची एक संधी आहे. पुनर्वापर हा चक्रीय अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग आहे, जो आपल्या नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करण्यास मदत करतो. दरवर्षी मसातवे संसाधनफ (पुनर्वापर करण्यायोग्य वस्तू) ७०० दशलक्ष टनांपेक्षा जास्त $CO_2$ उत्सर्जनाची बचत करते आणि २०३० पर्यंत हे प्रमाण १ अब्ज टनांपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. कागद आणि कागदी पॅकेजिंगच्या बाबतीत, युरोपमध्ये ८३% पेक्षा जास्त पुनर्वापर केला जातो, ज्यामुळे तंतू अधिक काळ चक्रात राहतात आणि त्यांच्या अक्षय स्रोताचे फायदे अधिक काळ टिकतात.

पुनर्वापर आपल्या जीवनाचा एक नियमित भाग बनल्यामुळे, कचराभूमी आणि विल्हेवाटीच्या अधिक खर्चिक पद्धतींची गरज कमी होण्यास मदत झाली आहे. पुनर्वापरामुळे कच्च्या मालाचे उत्खनन (खाणकाम, दगडखाण आणि लाकूडतोड), शुद्धीकरण आणि प्रक्रिया करण्याची गरजही कमी होते, ज्या सर्वांमुळे मोठ्या प्रमाणात हवा आणि पाणी प्रदूषण होते. यामुळे ऊर्जेची बचत होते, हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी होते आणि हवामान बदलाचा सामना करण्यास मदत होते. आजच्या वाढत्या शहरीकरणामुळे आणि उद्योगधंद्यांमुळे मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण होतो. प्लास्टिक, धातू, काच, कागद आणि इलेक्ट्रॉनिक कचरा यांचा योग्य प्रकारे पुनर्वापर केल्यास पृथ्वीवरील भार कमी होऊ शकतो. या प्रक्रियेमुळे ऊर्जा बचत, प्रदूषण नियंत्रण आणि हवामान बदलावर नियंत्रण मिळवणे शक्य होते.

या दिवसाचे मुख्य ब्रीद म्हणजे "Recycling Hero", ज्याअंतर्गत लोकांना आणि कंपन्यांना पुनर्वापर सवयी लावण्यास प्रोत्साहित केले जाते. प्रत्येकाने आपापल्या स्तरावर कचऱ्याचे वर्गीकरण करून पुनर्वापर करण्याची सवय लावल्यास पृथ्वीवरील संसाधनांचे जतन होईल आणि पर्यावरण संतुलन राखले जाईल. त्यामुळे, पुनर्वापर हा आपला सामाजिक आणि नैतिक जबाबदारीचा एक महत्त्वाचा भाग आहे.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

१८ मार्च
१) श्रीम. रेवती हरिश्चंद्र कोळी
विद्यानगर, अलिबाग
१८-३-१९३६

# योजना असतानाही रुग्णांकडून पैसे घेणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई

## सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांची माहिती

। मुंबई । प्रतिनिधी ।

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना लागू असतानाही रुग्णांकडून पैसे घेणाऱ्या रुग्णालयांवर शासनाकडून कारवाई करण्यात येत असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत दिली. योजनांमध्ये पारदर्शकता वाढवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (ए.आय.) आधारित यंत्रणेचा वापरही करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

या संदर्भात सदस्य नाना पटोले यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला होता. या चर्चेत सुनिल प्रभू, बबनराव लोणीकर आणि रत्नाकर गुट्टे यांनी सहभाग घेतला.

मंत्री आबिटकर म्हणाले की, काही रुग्णालयांकडून अनियमितता झाल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. या तक्रारींची दखल घेत राज्यात ३३८ प्रकरणांमध्ये एकूण सुमारे ६०.४७ लाख रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

अकोला जिल्ह्यातील एका खासगी रुग्णालयाविरुद्ध योजना लागू असतानाही तपासण्या व शस्त्रक्रियांसाठी रुग्णांकडून पैसे घेतल्याच्या एकूण १२ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. राज्य आरोग्य हमी सोसायटीने केलेल्या चौकशीनुसार एका रुग्णास घेतलेले पैसे परत करण्यात आले असून संबंधित रुग्णालयावर नियमानुसार दंडात्मक कारवाई प्रस्तावित आहे. उर्वरित ११ तक्रारींच्या संदर्भात संबंधित रुग्णालयांना नोटिसा बजावण्यात आल्या असून चौकशी सुरू आहे.

राज्यात महात्मा फुले जन आरोग्य योजनेमध्ये आयुष्मान भारत योजना समाविष्ट केल्यानंतर उपचारासाठी समाविष्ट आजारांची संख्या वाढविण्यात आली असून त्यानुसार उपचार पॅकेजेसमध्येही वाढ करण्यात आली आहे. योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी एआय,च्या माध्यमातून तक्रारींचे परीक्षण करून तात्काळ कारवाई केली जात असल्याचेही मंत्री आबिटकर यांनी सांगितले.



### वारंवार चुका झाल्यास गुन्हा दाखल

योजनेंतर्गत रुग्णांकडून अतिरिक्त पैसे घेतल्याचे आढळल्यास संबंधितांवर तात्काळ कारवाई करण्यात येईल. वारंवार चुका करणाऱ्या रुग्णालयांविरुद्ध गुन्हे दाखल करण्याची कार्यवाहीही करण्यात येईल, असेही मंत्री आबिटकर यांनी स्पष्ट केले.

### दर तीन महिन्यांनी आढावा बैठक

तसेच योजनांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी लोकप्रतिनिधींच्या सहभागातून समिती स्थापन करण्यात आली असून पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली दर तीन महिन्यांनी जिल्हास्तरावर आढावा बैठक घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# लाचखोर पोलीस निरीक्षकाला अटक

**मुंबई :** लाचलुचपत विभागाने सहाय्य पोलीस निरीक्षकाला लाच स्वीकारताना रंगेहाथ पडकले. तुषार काळे असे लाच घेणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याचे नाव असून तो खार पोलीस ठाण्यात कार्यरत होता. तक्रारदार यांचे वांद्रे न्यायालयात एक प्रॉपर्टीचे प्रकरण सुरू आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी तुषार काळेची नेमणूक करण्यात आली होती. हा अहवाल तक्रारदाराच्या बाजूने देण्यासाठी काळेने तीन लाख रुपयांची लाच मागितली होती. तक्रारदाराने एसीबीला याबाबत माहिती दिली. यानंतर एसीबीने सापळा रचून तुषार काळेला लाचेचा पहिला हफ्ता स्वीकारताना रंगेहाथ पकडून अटक केली.


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**विमल सॉ मिल उचेडे पेण**



**कै. अर्चना अरुण साप्ते, स्मरणार्थ अलिबाग**


## जाहीर सूचना

याद्वारे **सूचना** देण्यात येत आहे की, २०१, दिलकुशा, ५/ए अल्टामाउंट रोड, मुंबई - ४०० ०२६ येथे राहणारे श्री. निखिल मधुसूदन शाह हे येथे खाली लिहीलेल्या **परिशिष्टात** अधिक विशेषत्वाने वर्णन केलेल्या मालमत्तेचे मालक आहेत. त्या संदर्भात आम्ही त्यांचा हक्क, मालकी हक्क आणि हितसंबंधाची चौकशी करत आहोत. आमचे अशिल मालकाकडून सदर मालमत्ता खरेदी करण्यास इच्छुक आहेत.

सर्व व्यक्तिं ज्यांना मालमत्ता संबंधी कोणताही हक्क, मालकी हक्क, दावा किंवा हितसंबंध जसे की विक्री, विकास करार किंवा अधिकार, गहाणखत, खरेदी, देवाण घेवाण, हस्तांतरण, असाइनमेंट, ताबा, भाडेपट्टा, परवाना, धारणाधिकार, वारसा, उत्तराधिकार, भेट, हक्क, वहिवाटीचा हक्क, विश्वस्त संस्था, देखभाल, दस्तऐवज, ताबा किंवा अन्यथा कोणत्याही स्वरुपाचे असेल (एकत्रितपणे "दावे" म्हणून संदर्भित) तर त्यांनी याद्वारे कृपया लेखीस्वरुपात त्याची सूचना संबंधित कागदपत्रांसह निम्नस्वाक्षरीकारांकडे त्यांचे कार्यालय ४०२, ४था मजला, कॉमर्स हाऊस, १४० नगिंदास मास्टर रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ आणि amit@pradhanandrao.com आणि rupali@pradhanandrao.com, या इमेल पत्त्यांवर येथे ही सूचना प्रकाशित झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा अशा व्यक्तिंचे दावे, जर असतील तर ते सर्व हेतू आणि उद्देशाने सोडून देण्यात आले आहेत आणि/किंवा त्याग केले आहेत असे मानले जाईल आणि अशा परिस्थितीत आमचे अशिल विचारात घेतलेला व्यवहार सुरु करतील.

**येथे उपरोक्त उल्लेखित परिशिष्ट**

कृषी जमीनीचे सर्व तुकडे आणि हिस्से मोजमाप २-७५-२९ एच-आर-पी एकूण २७,५२९ चौ. मीटर्स (अंदाजे) ज्याचे गट क्र. ३३७/१ जे मौजे आगरसुरे, तालुका अलिबाग आणि जिल्हा रायगड येथे स्थित आणि असलेले आणि चतु:सीमा खालील प्रमाणे:

उत्तरेस किंवा उत्तरेकडे: गट क्र. ३३६

दक्षिणेस किंवा दक्षिणेकडे: गट क्र. ३४४ आणि ४४१

पूर्वेस किंवा पूर्वीकडे: गट क्र. ३३७/२ आणि मौजे रोड

पश्चिमेस किंवा पश्चिमेकडे: गट क्र. ३४८ आणि ३४७.

१८ मार्च, २०२६ रोजी दिनांकित.

**प्रधान आणि राव** करिता
ॲडव्होकेटस् आणि सॉलिसिटर्स
अमित एस. प्रधान
भागीदार

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाच्या मौजे कामार्ले, ता. अलिबाग येथील मिळकती, त्या मिळकतींचे विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| कामार्ले | २४४ | ०-४१-००<br>पो.ख.०-२१-००<br>एकूण ०-६२-०० | ०.६० | श्री. विनोद परशुराम पाटील |
| कामार्ले | २४५ | ०-२३-५०<br>पो.ख. ०-०२-८०<br>एकूण ०-२६-३० | ३.७५ | श्री.रविंद्र लक्ष्मण पवार |

सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लीएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहीत लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरुन आमचे अशिल सदरच्या मिळकती खरेदी करतील मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
ता. १८-०३-२०२६

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा.वत्सला टिळक रोड, स्टेट बँकेसमोर
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९४२२३७५११५

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. गोरख दगडु पाटील यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे माले, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ४९/१० एकुण ०.८४.०० गुंठे क्षेत्र पैकी श्री. गोरख दगडु पाटील यांचे हिश्याचे क्षेत्र ०.२०.०० विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ५ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक १८/३/२०२६

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे तळवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्क नोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकती आमचे अशिलांनी तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे तळवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १) जमशेद आलम खान<br>२) फातिमा खातुन मोहमद नासीर खान<br>३) मुसफेरा बानो मोहमद नासीर खान<br>४) मोहमद हसन मोहमद नासीर खान<br>५) शादमा खातुन मोहमद नासीर खान<br>६) मोहमद रेहान मोहमद नासीर खान<br>७) मिसबाह खातुन मोहमद नासीर खान<br>८) मोहमद अदनान नासीर खान<br>६, ७ व ८ चे अपाक म्हणून फातिमा खातुन मोहमद नासीर खान | ३६ | १ | एकूण क्षेत्र ०-२६-८०<br>त्यापैकी<br>०-२०-०० | ४.१२<br><br>४.५० |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकतीची निर्वेध बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीची खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : १८/०३/२०२६

**ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यु को.ऑप. हौ. सोसायटी,
शॉप नं. १, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो.: ९५९५३२४२३४/९५६१५७५६२६

## e-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-4/26-27<br>**7000039367** | Providing services of 01 No. of outsource driver for departmental truck for Hot line unit Kharghar under EHV (O&M) Circle, Panvel for the period 01.04.2026 to 31.03.2027<br>**Tender Fee Rs. 500/- + GST** | **Rs. 5,70,936/-** |

**EMD 1%** of estimated cost. Submission of bids from **17.03.2026 at 18:30 Hrs. to 01.04.2026 at10:59hrs**, Opening **date:- 01.04.2026 @ 11:00 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** The Executive Engineer (Adm.) **Mobile No.:** 8412050202, **E-mail ID:** se7200@mahatransco.in

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बागायत जमिन मिळकत ही कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून व त्या आशयाची बयानापावती संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व कब्जेदार श्री.राज महादेव कडू यांच्याबरोबर स्वाक्षरीत झालेला आहे.

संदर्भित मिळकत ही पूर्णत: निर्वेध, बोजाविरहीत व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालक व कब्जेदाराने माझ्या अशिलांना दिला आहे. या उपरही सदर मिळकतीत अन्य कोणाच्याही, कसल्याही तऱ्हेचे हक्क, अधिकार व हितसंबंध असल्यास तसेच गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वहिवाटहक्क, फरोक्तखत असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या कालावधीत लेखी पुराव्यानिशी माझी खात्री पटवून द्यावी.

विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल निम्नलिखित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. | उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|---|
| नागाव<br>ता.अलिबाग<br>जि.रायगड | १२६३ | २ | ०-०९-७०<br>पो.ख. ०-०२-६५<br>एकूण ०-१२-३५ | ०३.५२ |

ठिकाण :- अलिबाग,
दिनांक :- १८-०३-२०२६

**ॲड. सुधाकर पी.प्रभू**
'साईलिला'सी.एच.एस.
'ए विंग' रुम नं. १०३, चेंढरे
ता.अलिबाग,रायगड
मोबाईल नं.९८२२७९६८३०

## जाहीर पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की,

मौजे चांदई, ता-कर्जत, जि-रायगड येथील शेती जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक (१) घनश्याम पुनमभाई पटेल, रा-जैन हॉस्पिटल जवळ विठ्ठल नगर, कर्जत जि. रायगड २) राकेश मुलचंद कोठारी रा- कॉस्मीक हाइटस भक्ती आय मेक्स थेयटरच्या बाजुला वडाला ईस्ट व ३) संजेश देवीचंद रा- जैन मंदिराजवळ महावीर पेठ गणपती ज्वेलर्स कर्जत ता- कर्जत जि. रायगड यांनी खालील वर्णन केलेली मौजे चांदई येथील जमीन मिळकत तीचे वर्णन

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ७० | ३ | एकुण क्षेत्रफळ -०.०७.६० हे.आर.पॉ. | ०.०९ |
| ७० | ४ | एकुण क्षेत्रफळ ०.४६.५० हे.आर.पॉ. | ६.७० |
| ७० | ६ | एकुण क्षेत्रफळ ०.११.६० हे.आर.पॉ. | ०.०९ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक यांनी आमचे आशिलास सदरच्या मिळकती कायमच्या खरेदीखताने विकत देण्याने ठरवलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही हक्कहितसंबंध, तोंडी अथवा लेखी करार असल्यास तसेच या इसमाचा अगर संस्थेचा इसमांना अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र, फरोक्त, वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन सात (०७) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही हे कळावे.

दिनांक १८/०३/२०२६

**ॲड. भारत अंकुश सावंत**
**(बी कॉम. एल. एल. बी )**
**पत्ता-मु पो मोठे वेणगाव**
**ता-कर्जत जि-रायगड**
**संपर्क क्रमांक ९५५२२९६६२२**

## जाहीर नोटीस

दि. १७/०३/२०२६

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरच्या मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक वसंत बारक्या दळवी यांचेसोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र(हे.आर चौ.मी) | आकारणी |
|---|---|---|---|
| ज्ञानवाडी<br>ता.अलिबाग | ३८/२ | ०-२३-७०<br>पो.ख. ०-०२-३०<br>एकुण ०-२६-०० | ५.८२ |

वर वर्णन केलेली मिळकत हि या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. पेझारी पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा.नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मुळ भोगवटाधारक- श्री. एकनाथ कृष्णाजी कोरडे यांच्या मालकीची, ताबेकब्जातील आणि वहिवाटीतील मौजे कुशिवली, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग १६/१/क एकूण क्षेत्र १-१७-०० (हे-आर-चौ.मी.) क्षेत्राची मिळकत ही आमचे आशिलांनी वर नमूद मिळकतीचे मुळ जमिन मालक/भोगवटादार यांच्याकडून खरेदी करण्याचे निश्चित केलेले आहे. तरी सदर मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त करण्यापूर्वी आमचे अशिलांनी सदर मिळकतीमधील संबंधीत मुळ मालक/भोगवटादारकांचे असलेले मालकी हक्क तपासण्याकरीता आमचे अशिलांचे वतीने सदरची जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

तरी वर नमूद मिळकत वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क - हितसंबंध, कुळ - वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाच्या आत आपल्या हक्क, हितसंबधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून तसा टायटल रिपोर्ट देण्यात येईल तसेच सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर वर नमूद मिळकती नोंदणीकृत खरेदीखताद्वारे हस्तांतरीत करुन घेतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

सही/-
**ॲड. समीर शांताराम म्हात्रे**

## जाहीर नोटीस

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

ज. नों. प्रस्ताव क्र. १२५/२०२६

१. प्रतिक गणेश गावडे, — अर्जदार
रा. वडगाव, ता. माणगाव, जि. रायगड

विरुद्ध

२. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
निजामपूर, ग्रामपंचायत गोरेगाव,
ता. माणगाव, जि. रायगड — सामनेवाले
३. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव
जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, निबंधक जन्म-मृत्यू विवाह नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत गोरेगाव, ता. माणगाव यांचेकडील जन्म मृत्यू अधिनियम, १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ अन्वये या कार्यालयाकडे विलंबाने जन्म नोंद होणेकामी प्रस्ताव दाखल झाला आहे. त्यान्वये त्यांनी प्रतिक गणेश गावडे, रा. वडगाव, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. २१/०६/२००४ रोजी मौजे गोरेगाव, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असल्याचे नमूद केले आहे.

प्रतिक गणेश गावडे, रा. वडगाव, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. २१/०६/२००४ रोजी मौजे गोरेगाव, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असून त्यांना जन्म प्रमाणपत्र आवश्यक होते. परंतु सदर नोंद ग्रुप ग्रामपंचायत गोरेगाव, ता. माणगाव, जि. रायगड यांचे अभिलेखामध्ये आढळून आलेली नाही. त्यामुळे निबंधक जन्म-मृत्यू-विवाह नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत गोरेगाव, ता. माणगाव यांनी त्यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी आदेश मिळणेबाबत प्रस्ताव दाखल केला आहे.

तसेच प्रतिक गणेश गावडे, रा. वडगाव, ता. माणगाव, जि. रायगड यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी निबंधक जन्म-मृत्यू नोंदणी, ग्रामपंचायत गोरेगाव यांचेकडील प्रस्तावही या कार्यालयास प्राप्त झाला आहे. तरी सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता पंधरा दिवसांचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास प्रतिक गणेश गावडे, रा. वडगाव, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. २१/०६/२००४ रोजी मौजे गोरेगाव, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला येथे झाला असे गृहीत धरून त्यांच्या जन्माची नोंद होणेबाबत आदेश देण्यात येईल.

ठिकाण: माणगाव
दिनांक : १३/०३/२०२६

**(विपीन लोकरे)**
कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसीलदार माणगाव

## सार्वजनिक सूचना

हे आपल्याला सूचित करत आहोत की आमच्या प्लॉट क्र. ए-१, ए-२/२, ए-२/३ व ए-२/४, पाताळगंगा बोरीवली औद्योगिक क्षेत्र, बोरीवली, खालापूर, जि. रायगड येथे औद्योगिक एन्झाइम्स उत्पादन विस्तारासाठी प्रस्तावित औद्योगिक शेड बांधकाम प्रकल्प यांस भारत सरकारच्या पर्यावरण, वन आणि जलवायु परिवर्तन मंत्रालयाअंतर्गत येणाऱ्या राज्य स्तरीय पर्यावरण समाघात निर्धारण प्राधिकरणाकडून (SEIAA, महाराष्ट्र) पर्यावरण मंजूरी (EC No- EC25C-3806MH5750696N, File No-SIA/MH/INFRA2/556455/2025 दिनांक १४.०३.२०२६) देण्यात आली आहे. पर्यावरण मंजुरी पत्रांची प्रत पर्यावरण, वन आणि जलवायु परिवर्तन मंत्रालय (MoEF&CC's), यांच्या परिवेश वेबसाइटवर http://parivesh-nic-in येथे उपलब्ध आहे.

ठिकाण: रायगड

सही/-
नोव्होजाइम्स साऊथ एशिया प्रा. शि

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस ह्या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची बिनशेती मिळकती, सदर मिळकतींचे विद्यमान मालक हुसेन झाकीर कांचवाला यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतींचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित बिनशेती जमीन मिळकती ह्या पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतींचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतींमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| चेंढरे,<br>ता. अलिबाग,<br>जि. रायगड | ९३/१/ब/१/८ | २-६२-०० | २६.२० |
| | ९३/१/ब/१/९ | २-६२-०० | २६.२० |

अलिबाग,
दिनांक-१७/०३/२०२६

**ॲड. महेश सुहास म्हात्रे**
MAHESH S. MHATRE
ADVOCATE
ENROLLMENT No. MAH/5773/2006
Rituraj Plaza, Ground Floor, Flat No. 1.
Ch. Shivaji Chouk Near Gawade Optics, Alibag Raigad

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. तेजस दिलीप बुटाला व सौ. स्वराली तेजस बुटाला दोघेही रा. प्रथमेश सोहम, गांगळ आळी, पेण-रायगड यांनी खालील वर्णनांची जमिन ही सदर जमिनीचे विद्यमान मालक श्री. परशुराम धर्मा कोळी व सौ. प्रमिला परशुराम कोळी दोघेही रा. इस्त्राईल आळी, पेण, तालुका-पेण, जिल्हा-रायगड यांचेकडुन रजिस्टर खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असुन त्याबाबत उभयतांमध्ये सविस्तर बोलणी झाली आहेत.

मिळकतीचे वर्णन जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका पेण, मे. दुय्यम निबंधक पेण यांचे कार्यक्षेत्रातील तलाठी सजा-बेलवडे बुद्रुक, मौजे-राठीची वाडी येथील गट नं. २४/२ क्षेत्र ५-२०-०० हे आर.चौ.मी. त्यासी आकार रु. २८-९० पैसे पैकी श्री. परशुराम धर्मा कोळी व सौ. प्रमिला परशुराम कोळी यांचे सामाईक हिश्श्याची व नांवे असलेली ०-१६-० हे आर.चौ.मी. त्यासी आकार रु. १-०६ ही जमिन या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

सदरची जमिन ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याची ग्वाही सदर जमिनीचे विद्यमान मालकांनी माझे अशिलांना दिली आहे. तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशिर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले दिवशी पासून २१ (एकवीस) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर हरकत न आल्यास सदरची ०-१६-० हे.आर.चौ.मी. ही जमिन निर्वेध व बोजाविरहित आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदती नंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण- रायगड.
दि. १८/०३/२०२६. सही

**ॲड. संजय भास्कर पाटील**
**परमार प्लाझा, शॉप नं. १६.**
**तळ मजला शिवाजी पथ. पेण- रायगड. ४०२१०७.**
**मोबा. ९८८१९१५२१९**

## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आमच्या अशिलांच्या वतीने आम्ही खालील निर्देशित अनुसूची १ मध्ये विस्तृतपणे विवरणीत मालमत्तेसंदर्भात (यापुढे सदर जमीन म्हणून उल्लेखित) मालक म्हणून मे. कॅलिदाद होम्स एलएलपी यांच्या हक्कांची चौकशी करीत आहोत. पुढे, आम्हाला मे. कॅलिदाद होम्स् एल-एलपी यांच्याद्वारे असे सूचित करण्यात आले आहे की, अनुसूची २ मध्ये विस्तृतपणे विवरणीत केल्यानुसार सदर जमिनीसंदर्भातील मूळ हक्क दस्तावेज (यापुढे हक्क दस्तावेज म्हणून उल्लेखित) हे त्यांच्या ताब्यातून गहाळ/हरवले/जागेवर नाहीत आणि सातत्याने शोध घेऊनही ते सापडत नाहीत.

कोणाही व्यक्तीचा, यामध्ये सोसायटी/न्यास/कंपनी/एलएलपी/भागीदारी संस्था यांचा समावेश आहे, यांना मूळ हक्क दस्तावेज सापडल्यास किंवा सदर जमीन व /वा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात भार, उत्तराधिकार, हिस्सा, विक्री, अभिहस्तांकन, सामंजस्य करार, विकास हक्क, दायित्व वा वचनबद्धता वा मागणी, विनिमय, विभाजन, गहाण, देखभाल, भाडेकरार, उप-भाडेकरार, धारणाधिकार, अनुज्ञप्ती, भेट, ताबा, भागीदारी, वहिवाट, न्यास, प्रभार, मृत्यूपश्चात वारसा, गहाण, हमी, कर्जे, आगाऊ रकमा, निषेधाज्ञा, विचाराधीन विवाद वा अन्य कोणतीही जप्ती स्वरूपात किंवा कोणतेही विधि न्यायालय, न्यायाधिकरण वा वैधानिक प्राधिकारी वा लवाद यांच्याद्वारे मंजूर कोणताही निवाडा, आदेश वा हुकूम, जुना वहिवाट हक्क वा अग्रहक्क वा भार वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही दावा वा हक्क असल्यास त्यांनी त्यासंदर्भात सदर सूचेच्या प्रसिद्धी दिनांकापासून सात (०७) दिवसांच्या आत त्यांचा हिस्सा वा दावा, काही असल्यास, सर्व सहाय्यक दस्तावेजांसमवेत सूचित करावा अन्यथा अशा दाव्याच्या कोणत्याही संदर्भाविना पुढील व्यवहार/हस्तांतरण/प्रभार निर्मिती पूर्ण करण्यात येईल व अशा व्यक्तींचे असे सर्व दावे, काही असल्यास ते अधित्यागित समजण्यात येतील व आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

**वरील संदर्भित अनुसूची १**

**(सदर जमिनीचे विवरण)**

पुढील विवरणीत पूर्ण स्वामित्वाच्या जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड - सर्व्हे क्र. १६/१, मोजमापित ९६० चौ. मी. (सदर जमीन क्र. १) व २) सर्व्हे क्र. १६/२/बी, मोजमापित २१३० चौरस मीटर (सदर जमीन क्र. २), गाव कोप्रोली, तालुका पनवेल, जिल्हा रायगड - ४१०२०६ (यापुढे सदर जमीन क्र. १ व सदर जमीन क्र. २ एकत्रितरीत्या सदर जमीन म्हणून उल्लेखित).

**वरील संदर्भित अनुसूची २**

**(हक्क दस्तावेजांचे विवरण)**

| अ. क्र. | विवरण |
|---|---|
| १) | अ) सुमित्रा सुदर्शन जोगळेकर, ब) योगेश सुदर्शन जोगळेकर व क) योगिनी सुदर्शन जोगळेकर यांच्याद्वारे सर्व्हे क्र. १६/१ मोजमापित ९५० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या जमिनीसंदर्भात मुक्ताबाई लक्ष्मण गायकवाड यांच्या नावे केलेला अ. क्र. १६९९/१९९० धारक विक्री करार दि. ०७.०७.१९९०. |
| २) | अ) कमलाकर जनार्दन पाटील, ब) शरद जनार्दन पाटील, क) सचिन जनार्दन पाटील, ड) नितीन पुंडलिक पाटील यांच्याद्वारे सर्व्हे क्र. १६/२/बी धारक २१३० चौ. मी. क्षेत्रफळाच्या जमिनीसंदर्भात मे. एव्हरग्रीन असोसिएट्स - एक भागीदारी संस्था त्यांचे भागीदार विलास मदनलाल कोठारी, नितीन चंद्रकांत मुनोथ, बिपीन चंद्रकांत मुनोथ यांच्या नावे नोंदणीकरण क्र. पीव्हीएल -१ /९५५६/२०११ धारक विक्री करार दि. १७.०८.२०११. |

दिनांक : १८ मार्च, २०२६

**ॲडव्होकेट धीरज जैन - व्यवस्थापकीय भागीदार**
**डी.एम. असोसिएट्स**
३०५, ३ रा मजला, ईएमसीए हाऊस,
२८९, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई -४०० ००१.

# निवडक



## महाडमध्ये हॉटेल-ढाबा व्यवसाय संकटात

**महाड :** महाड तालुक्यात व्यावसायिक गॅस सिलिंडर उपलब्ध होत नसल्याने हॉटेल व ढाबा व्यवसाय अडचणीत सापडला आहे. या पार्श्वभूमीवर महाड तालुका हॉटेल-ढाबा चालक-मालक संघटनेने प्रशासनाकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात संघटनेतर्फे प्रांताधिकारी पोपट ओमासे यांना निवेदन देण्यात आले. सध्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे घरगुती गॅस सिलिंडरची टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी व्यावसायिक गॅस सिलिंडरचे बुकिंग बंद करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. मात्र, या निर्णयाचा सर्वाधिक फटका हॉटेल-ढाबा व्यवसायिकांना बसत आहे. महाड शहरातील गॅस एजन्सींमार्फत व्यावसायिकांना गॅस सिलिंडर उपलब्ध करून देण्याच्या स्पष्ट सूचना द्याव्यात, अशी मागणी संघटनेने प्रशासनाकडे केली आहे. या निवेदनावर सुमारे १४ हॉटेल व ढाबा चालक-मालकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. गॅस उपलब्ध नसल्यामुळे अनेक व्यावसायिकांना व्यवसाय बंद करण्याची वेळ येत असून, या क्षेत्रावर अवलंबून असलेल्या कुटुंबांच्या रोजगारावरही संकट निर्माण होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.



## स्वच्छतादुतांना कडधान्य वाटप

**आगरदांडा :** मुरूड जंजिरा नगरपरिषद कार्यालयातील सभागृहात ५५ स्वच्छदुतांना कडधान्य किट वाटप मंत्री आदिती तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मंगळवारी (दि.१७) मार्च रोजी करुन त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी नगराध्यक्षा आराधना दांडेकर, माजी नगराध्यक्षा मंगेश दांडेकर, मनोज भगत, हसमुख जैन, प्रमोद भायदे, प्रमिला माळी, श्रध्दा अपराध, देवायानी गुरव, अजित कासार, विश्वास चव्हाण, आदेश दांडेकर, इस्माईल सिद्दीकी, आशिष हेदुळकर, योगेंद्र गोयजी, दत्ता नाक्ती उपस्थित होते. यावेळी माजी नगराध्यक्षा दांडेकर यांनी सांगितले की, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नुकतेच अपघाती निधन झाल्याने मंत्री आदिती तटकरे यांच्या वाढदिवसाचा गाजावाजा न करता सामाजिक उपक्रम राबुन वाढदिवस साजरा करायचे ठरविले. त्याच अनुषंगाने आपल्या परिसराची स्वच्छता राखणारे गरीब स्वच्छता दूतांना संपुर्ण कडधान्याचे कीट वाटप करुन सन्मान करण्याचे ठरविले.



## तरुणांना मार्गदर्शनासाठी अकॅडमी सुरु

**नेरळ :** राज्य लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या परीक्षेतून पोलीस उपनिरीक्षक बनलेले नयन वाघ यांनी ऐनाची वाडी येथे अकॅडमी सुरू केली आहे. पोलीस तसेच अन्य भरतीमध्ये तरुणांना मार्गदर्शन करणारी अकॅडमी नयन यांनी सुरू केली आहे. या अकॅडमीसाठी निवृत्त कर्नल डॉ. कुशाग्र पटेल यांचे माध्यमातून विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बेंचेस भेट देण्यात आले आहेत. एमपीएससी परीक्षेत पोलीस उप निरीक्षक हा टप्पा पूर्ण करणारे कर्जत तालुक्यातील ऐनाची वाडी येथील नयन यांच्यावर कौतुकाचा वर्षाव झाला होता. या आदिवासी तरुणाने अकॅडमी सुरू करण्याची तयारी दाखवली होती. त्यासाठी आदिवासी विकास विभागाचे वतीने पोलीस भरतीची पुस्तके भेट दिली होती. त्यानंतर ऐनाची वाडी येथे नयन यांनी धरती आबा बिरसा मुंडा या नावाने अकॅडमी सुरू केली आहे. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू झाले असून ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थी येथे येऊन अभ्यास करतात. या विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बाकांची गरज असल्याने रायगड हॉस्पिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुशाग्र पटेल यांचे माध्यमातून २५ बेंचेन्स भेट देण्यात आले. लष्कराच्या सेवेतून निवृत्त झालेले कर्नल डॉ पटेल यांनी ऐनाची वाडी येथे जाऊन त्या बेंचेस वाटप करण्यात आले.

## भंगारच्या दुकानाला भीषण आग

**खोपोली :** हाळ गावच्या हद्दीतील भंगार साहित्याच्या दुकानाला १६ मार्च दुपारी २ वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. दुकानात प्लास्टिक आणि कलरचे ड्रमला आग लागल्याने आगीने रौद्ररूप धारण केले होते. घटनास्थळी नगर खोपोली नगर परिषदेची अग्निशमन दलाचे जवानानी आग विझविण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले.



आग मोठी असल्याने आलाना, एचओसी कंपनीच्या फायर गाड्या बोलविण्यात आल्यानंतर काही तासांनी आग विझविण्यात यश आले असले तरी, आगीचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. मुंबई पुणे जुन्या मार्गाच्या बाजूला अनेक भंगाराची गोदामे आहेत. हाळ गावाजवळ याक पब्लिक स्कूलच्या रस्त्याच्या बाजूला असलेल्या भंगाराच्या दुकानाला भीषण आग लागली आहे. घटनास्थळी नगर खोपोली नगर परिषदेची अग्निशमन दलाचे जवानानी आग विझविण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले. घटनास्थळी खालापूरचे तहसीलदार अभय चव्हाण, विक्रम साबळे, मोतीराम ठोंबरे यांनी अनुचित प्रकार घडू नये याची दक्षता घेऊन फायर ब्रिगेडचे वाहने बोलविली. या आगीत भंगारच्या दुकानातील प्रचंड नुकसान झाले असले तरी जिवीतहानी झाली नसल्याचे समजते.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **बांधकाम साहित्य विक्री दुकानात अकाऊंटस** टॅलीचा अनुभव असलेली मुलगी पाहिजे. किमान २/३ वर्षाचा अनुभव संपर्क- ८८०६६८३२३२, ८००७८९३२३२
- **अलिबाग मधील ऑफिस करीता** खालील जागा भरणे आहे. साईट सुपरवायझर व ऑटोकॅड ड्राफ्ट्समन मो.नं. ९९७०३९१६९७

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# महाडला अनधिकृत पार्किंगचा विळखा

## रस्त्याची रुंदी कमालीची घटली; स्थानिकांना घराबाहेर पडणे झाले मुश्कील

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड औद्योगिक वसाहतीमधील (एमआयडीसी) विविध कंपन्यांच्या खासगी बसेसनी महाड शहराच्या मुख्य रस्त्यांवर जणू आपलेच साम्राज्य उभे केले आहे. दस्तुरी नाका ते भीमनगर या मुख्य वर्दळीच्या रस्त्यावर या बसेसनी अनधिकृत पार्किंगचा विळखा घातला आहे. स्थानिक रहिवाशांना घराबाहेर पडणेही मुश्कील झाले आहे. संपूर्ण रस्ताच या बसेसनी व्यापून टाकल्यामुळे साधी दुचाकी नेणेही आता जिकिरीचे बनले असून, पोलीस प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.



दस्तुरी नाका ते भीमनगर हा परिसर अत्यंत गजबजलेला आणि रहिवासी वस्तीचा आहे. मात्र, महाड एमआयडीसीमध्ये कामगारांची ने-आण करणाऱ्या खासगी बसेसनी या संपूर्ण रस्त्याचा ताबा घेतला आहे. रस्त्याच्या दुतर्फा अनधिकृतपणे उभ्या राहणाऱ्या या अवजड बसेसमुळे रस्त्याची रुंदी कमालीची घटली आहे. समोरून येणाऱ्या वाहनाला जागा मिळत नाही, परिणामी येथे दररोज वाहतूक कोंडी आणि किरकोळ अपघात होत आहेत. पोलीस प्रशासन एखाद्या भीषण अपघाताची वाट पाहत आहे का? असा जळजळीत सवाल स्थानिक रहिवासी विचारत आहेत.

### पोलिसाचे मौन

गंभीर समस्येकडे पोलीस प्रशासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. वारंवार तक्रारी करूनही या खासगी बस चालकांवर कोणतीही ठोस कारवाई होताना दिसत नाही. पोलिसांच्या या ढिम्म कारभारामुळे बस चालकांचे धाडस अधिकच वाढले असून, त्यांनी सर्वसामान्य नागरिकांच्या हक्काच्या रस्त्याला स्वतःचे खासगी यार्ड बनवले आहे.

> “महाड एमआयडीसीच्या खासगी बसेसनी सामान्य जनतेला अक्षरशः वेठीस धरले आहे. रस्त्यावर अनधिकृतपणे बसेस उभ्या करून सर्वसामान्यांची अडवणूक केली जात आहे. जर पोलीस प्रशासनाने या बसेसला वेळीच आवर घातला नाही, तर आम्ही गप्प बसणार नाही. जनतेच्या सोयीसाठी आणि सुरक्षिततेसाठी मनसे रस्त्यावर उतरून आपल्या स्टाईलने तीव्र आंदोलन करेल आणि त्यानंतर होणाऱ्या परिणामांना सर्वस्वी प्रशासन जबाबदार असेल.”
> -पंकज उमासरे
> मनसेनेचे महाड शहर अध्यक्ष




गुढीपाडव्यानिमित्त बांबू आणि फुलांना प्रचंड मागणी असते त्यामुळे बाजारात फुले आणि बांबू विक्रीची दुकाने सजली आहेत.

## उरणमध्ये गॅससाठी पहाटेपासून रांगा

**। उरण । प्रतिनिधी ।**

जगभरातील युद्धजन्य परिस्थितीचा फटका आता थेट उरण तालुक्याला बसू लागला असून गॅस सिलेंडर टंचाईने नागरिकांसह हॉटेल व्यावसायिकांचे कंबरडे मोडले आहे. घरगुती सिलेंडरसाठी पहाटेपासून रांगा लागत आहेत, तर व्यावसायिक सिलेंडर मिळेनासे झाल्याने हॉटेल व्यवसाय अक्षरशः बंद होण्याच्या मार्गावर पोहोचला आहे.

उरणमध्ये सध्या घरगुती सिलेंडर मिळवण्यासाठी नागरिकांना पहाटे ४ वाजल्यापासून गॅस कार्यालयासमोर रांगा लावाव्या लागत आहेत. कामधंदा बाजूला ठेवून लोक सिलेंडरसाठी ताटकळत उभे राहत आहेत. आज तर सिलेंडरची गाडी सकाळी ९ वाजता आल्याने रांगेत उभ्या असलेल्या नागरिकांचा संयम सुटला आणि सिलेंडर घेण्यासाठी हाणामारी होण्याची वेळ आली.

उरणमधील हॉटेल व्यावसायिकांची अवस्था बिकट झाली आहे. स्वयंपाकासाठी आवश्यक असलेले सिलेंडरच उपलब्ध नसल्याने अनेक हॉटेल चालक हतबल झाले आहेत. ही परिस्थिती अशीच राहिली तर उरणमधील अनेक हॉटेल व्यवसाय बंद पडण्याची वेळ येईल, असा इशारा हॉटेल व्यावसायिकांनी दिला आहे. दरम्यान, या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी उरणमधील हॉटेल व्यावसायिकांनी तहसीलदारांची भेट घेत आपले गाऱ्हाणे मांडले आहे.

## वैद्यकीय किटचे वाटप

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्थेला अधिक सक्षम आणि प्रभावी बनविण्याच्या उद्देशाने पोस्को महाराष्ट्र स्टीलच्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत माणगांव तालुक्यातील आशा सेविकांसाठी आवश्यक वैद्यकीय किट वितरण कार्यक्रमाचे आयोजन सोमवारी (दि.१६) मार्च रोजी माणगाव तहसील ऑफिस सभागृहात करण्यात आले.

उपक्रमाअंतर्गत तालुक्यातील एकूण १३७ आशा सेविकांना आवश्यक वैद्यकीय किटचे वितरण करण्यात आले. या किटमध्ये मूलभूत वैद्यकीय उपकरणे, टॉर्च आणि बॅग यांसह एकूण १३ अत्यावश्यक वस्तूंचा समावेश करण्यात आला आहे. ग्रामीण समाजाच्या आरोग्य आणि कल्याणासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविण्याची पोस्को महाराष्ट्र स्टीलची बांधिलकी या कार्यक्रमातून पुन्हा अधोरेखित झाली. आशा सेविकांना सक्षम बनवून ग्रामीण आरोग्यसेवा अधिक मजबूत करण्याचा कंपनीचा उद्देश या उपक्रमातून यशस्वीरित्या साध्य होताना दिसत आहे. या कार्यक्रमास महेंद्र तट्टे, डॉ. दिपाली पुरी, डॉ. दामोदर मोरे, डॉ. विनोद गोरेगांवकर तसेच पोस्कोच्या सीएसआर विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांच्या नावे जमा होणार ठेवी

**उरण :** दिघोडे ग्रामपंचायतीचे सरपंच किर्तीनीधी ठाकूर यांनी आयोजित केलेल्या मासिक मिंटीगमध्ये व ग्रामसभेत सन २०२५-२६ या वर्षापासून राजिपच्या दिघोडे शाळेतील इयत्ता १ ते ४ मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी व पालक यांच्या संयुक्त नावे पोस्ट खात्यात ५ हजार रुपयांची मुदत ठेव योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. ठाकूर यांच्या या निर्णयाच सर्वस्तरातून अभिनंदन केले जात आहे. यावेळी उपसरपंच कैलास अंबाजी म्हात्रे, अभिजित वसंत पाटील, अलंकार कोळी, संदेश पाटील, उज्वला म्हात्रे, अपेक्षा कासकर, अपेक्षा पाटील, आरती कोळी, रेखा कोळी, मत्स्यगंधा पाटील तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

## महापालिकेच्या विरोधी पक्षनेतेपदी अरविंद म्हात्रे

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नुकत्याच पार पडलेल्या पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने स्पष्ट बहुमत मिळवत वर्चस्व निर्माण केले असतानाच सोमवारी (दि. १६) मार्च रोजी पनवेल महानगरपालिकेच्या विरोधी पक्षनेतेपदी शेतकरी कामगार पक्षाचे नगरसेवक अरविंद म्हात्रे यांची निवड करण्यात आली.



महापालिकेच्या पहिल्याच महासभेत सभागृहनेता आणि विरोधी पक्षनेता यांची निवड होणे अपेक्षित होते. मात्र, सत्ताधाऱ्यांच्या भूमिकेमुळे ही निवड काही काळ प्रलंबित राहिली होती. यासंदर्भात शेतकरी कामगार पक्ष आणि महाविकास आघाडीच्या नगरसेवकांनी महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांची भेट घेतली होती. त्यावेळी विरोधी पक्षनेतेपदाचा निर्णय हा महापौरांचा अधिकार असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले होते.

त्यानंतर संबंधित शिष्टमंडळाने महापौर नितीन पाटील यांचीही भेट घेतली होती. मात्र, त्यावेळी याबाबत ठोस निर्णय जाहीर करण्यात आला नव्हता. या पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्षाचे नगरसेवक अरविंद म्हात्रे यांनी यासंदर्भात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेची सुनावणी दि. १७ मार्च रोजी होणार होती.

मात्र, त्यापूर्वीच महापौर नितीन पाटील यांनी शेतकरी कामगार पक्षाचे गटनेते केतन भगत यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून विरोधी पक्षनेतेपदाबाबत निर्णय झाल्याची माहिती दिली. त्यानंतर अरविंद म्हात्रे यांनाही दूरध्वनीद्वारे याबाबत कळविण्यात आले.

यानंतर सोमवारी दुपारी तीन वाजता अरविंद म्हात्रे यांनी विरोधी पक्षनेतेपदाचा अधिकृत कार्यभार स्वीकारला. यावेळी शेतकरी कामगार पक्ष व काँग्रेसच्या महाविकास आघाडीतील सर्व १३ नगरसेवक उपस्थित होते.

## गुढीपाडव्यानिमित्त पनवेल बाजारपेठ सज्ज

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहुर्त असलेल्या गुढीपाडव्यानिमित्त बाजारपेठ विविध साहित्याने सज्ज झाली आहे. गुढीचे साहित्य, नवी काठीसह पाडव्यासाठी नवी उत्पादने खरेदी करण्यासाठी ग्रामीण भागातील नागरिक शहरातील बाजारपेठमध्ये येत आहे. १९ मार्च रोजी गुढीपाडवा आल्याने बाजारपेठेमध्ये वस्त्र, साखरेची गाठी मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी आल्या आहेत.



गुढीपाडव्याचा खास मान असलेल्या साखरेच्या गाठी या वर्षी विविध रंगांमध्ये उपलब्ध करण्यात आल्या होत्या. किमान २० रुपयांपासून ते १०० रुपयांपर्यंत उपलब्ध आहेत. उंच बांबूपासून गुढी तयार केली जाते. बांबूच्या एका टोकाला रेशमी कापड, कडुलिंबाचा, फुलांचा हार, साखरेची माळ बांधून त्यावर धातूचे भांडे बसवला जातो. नंतर गुढी पाटावर उभी केली जाते. मात्र आताच्या धकाधकीच्या आणि धावपळीच्या युगात गुढी उभारण्यासाठी पुरेसा वेळही मिळणे कठीण झाले आहे. याला पर्याय म्हणूनच रेडिमेड गुढीचा नवा ट्रेण्ड निर्माण झाला. टेबलवर, कारमध्ये ठेवता येण्यासारख्या छोट्या गुढीसह मोठ्या रेडिमेड गुढ्या अत्यंत कमी किमतीत ६५ ते २५० रुपयांपर्यंत विविध आकाराच्या गुढ्या बाजारात उपलब्ध आहेत.

## संभे येथे हरिनाम सोहळ्याचे आयोजन

खांब : संभे येथे दि.२३ व दि.२४ मार्च रोजी अखंड हरिनाम यज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती देण्यात आली आहे. शंकर दगडे, मु.आंदोरी यांच्या परंपरेने पांडुरंग सुतार व सुनिती सुतार मु. महाड व अजीव सुतार यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होणाऱ्या या सप्ताह सोहळ्यात बुधवार दि.२३ रोजी ग्रामदैवत भरीनाथ अभिषेक, करण्यात येणार आहेत. या संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी सद्गुरू सेवा मंडळ व ज्ञानेश्वरी सत्संग पायी वारकरी सेवा मंडळ संभे तसेच ग्रामस्थ व महिला मंडळ व वीर हनुमान क्रीडा मंडळ संभे अधिक मोलाचे सहकार्य करीत आहेत.

## नागोठणे विभाग पत्रकार असो. वर्धापन दिनाचे आयोजन

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

गेल्या तेरा वर्षांपासून सातत्याने आपला वर्धापन दिन नित्यनियमाने साजरा करून रायगड जिल्ह्यासह नागोठणे शहर व ग्रामीण विभागात नावलौकिक मिळविलेल्या नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोसिएशनचा चौदावा वर्धापन दिन सोहळा शुक्रवारी (दि.२०) मार्च रोजी सायंकाळी ६.३० वाजता नागोठण्याची ग्रामदेवता श्री जोगेश्वरी मातेच्या प्रांगणात संपन्न होणार आहे. या कार्यक्रमास खा. सुनील तटकरे, महेंद्र घरत, मधुकर पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असल्याची माहिती पत्रकार असोसिएशनचे सचिव अनिल पवार यांनी दिली.

कार्यक्रमासाठी पत्रकार असोसिएशनकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे. नागोठणे शहर व ग्रामीण विभागासह रायगड जिल्ह्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व गुणवंत विद्यार्थ्यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला सुमित काते, किशोर जैन, नरेंद्र जैन, शिवराम शिंदे, सदानंद गायकर, प्रशांत गोपाळे, संदेश शेवाळे, राजेश मपारा, सोपान जांबेकर, सुप्रिया महाडिक, मनोजद खांडेकर, रसंतोष कोळी, विलास चौलकर, डॉ. मिलिंद धात्रक, सद्दाम दफेदार आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

### शिलार, पोशीर धरणाला विरोध | मुख्यमंत्र्यांच्या बंगल्याबाहेर उपोषणाचा इशारा

# कर्जतचे शेतकरी तहसील कार्यालयावर धडकले

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

राज्य सरकारने कर्जत तालुक्यात पोशीर आणि शिलार येथे धरण बांधण्याचे जाहीर केले आहे. या दोन्ही धरणासाठी एकाही शेतकऱ्याने आपली जमीन देण्याची परवानगी दिली नाही आणि तरीदेखील शासनाने धरणाचे काम करण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. त्या विरुद्ध शिलार धरण परिसरातील शेतकरी आणि पोशीर धरण परिसरातील शेतकरी यांनी धरणाच्या विरोधात प्रचंड मोर्चा काढला. या दोन्ही धरणाच्या विरोधात शेतकरी कर्जत शहरात धडकले आणि कर्जत तहसील कार्यालयावर पोहचले. दरम्यान प्रांत अधिकारी यांनी सध्या धरण परिसरात सुरु असलेले काम थांबवण्यास असमर्थता दर्शवली असून शेतकऱ्यांनी शासनाच्या भूमिकेकबद्दल नाराजी व्यक्त केली आहे.त्यामुळे आता थेट राज्याचे मुख्यमंत्री यांच्या घराबाहेर उपोषण करणाऱ्यांचा निर्धार शेतकऱ्यांनी केला आहे.



कर्जत तालुक्यातील पोश्री नदीवर बांधण्यात येत असलेल्या पोशीर धरणाला विरोध करण्यासाठी बोरगाव धरण विरोधी समितीच्या वतीने बोरगाव,उंबरखांड, भवानीपाडा,बोन्डेशेत, पेंढरी, चेवने भोपळेवाडी, झुगरेवाडी, ऐनाचीवाडी, चाफेवाडी, खांडस परिसर, चई, कोतवालवाडी, ओलमन, सुरुंग, तेलंगवाडी, गावंड वाडी येथीलस हेटकाऱ्यांनी कर्जत तहसील कार्यालयावर मोर्चा काढला. समितीचे प्रमुख तानाजी चौधरी, सचिव भरत डोंगरे, तसेच अशोक पाटील, लक्ष्मण पोसाटे, राजेंद्र डोंगरे, ललित धस, प्रभाकर खडेकर, नंदू खडेकर, नितीन पाटील, सुधीर शेळवले, समीर खडेकर यांच्या नेतृत्वाखाली मुरबाड कर्जत रस्त्यावरील छत्रपती संभाजी महाराज चौक येथून हा मोर्चा कर्जत तहसील कार्यालयावर पोहचला.

शिलार धरण प्रकल्पग्रस्त समितीचे वतीने निघालेल्या मोर्चाचे नेतृत्व दिनेश रसाळ, काशिनाथ रसाळ, माधव मिणमिने, अशोक आसवले, वसंत रसाळ, राजेंद्र भगत, काशिनाथ निरगुडे, रामदास शिंगटे, संतोष कदम, वसंत केवारी यांच्या नेतृत्वाखाली निघाला.

या मोर्चात शिलार धरणामुळे बाधित होतील अशा गावातील शेतकरी सहभागी झाले होते. त्यात धोत्रे, धोत्रेवाडी, शिलार, किकवी, पिंगलस, खांदन, शिलारवाडी, आनंदवाडी, मोगरज, भक्ताची वाडी, आंबिवली, शिंगधोळ, धामणी, जांभूळवाडी, चौधरी वाडी आदी शेतकरी सहभागी झाले होते.

प्रशासकीय भवन येथे मोर्चाचे वतीने प्रांत अधिकारी प्रकाश संकपाळ यांना निवेदन देण्यात आले.

### शेतक्यांची मागणी

शेतकऱ्यांची कोणतीही परवानगी नसताना सुरु असलेले धरणाचे काम थांबवावे आणि आधी शासनाने पर्यावरण विषयक जनसुनावणी घेण्यात यावी अशी मागणी शिलार आणि पोशीर धरणाच्या प्रकल्पग्रस्तांनी केली आहे.

# रस्त्यावरील धुळीचा वाढता त्रास

**अलिबाग :** तालुक्यातील रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरण करण्याचे काम जोरात सुरू आहे. परंतु, यामुळे उडणाऱ्या धुळीचा त्रास नागरिकांसह वाहनचालकांना सहन करावा लागत आहे. त्यामुळे या धुळीवर पाण्याचा फवारा करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.


## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**निविदा सूचना क्रमांक 13, 14, 15 / 2025-26**

क्षेत्रीय रेल्वे प्रबंधक, रत्नागिरी, कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड (केआरसीएल) यांच्या वतीने, क्षेत्रीय यातायात प्रबंधक, रत्नागिरी, आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा द्वारे (दोन पाकीट प्रणाली) पात्र कंत्राटदारांकडून कोकण रेल्वेवर चिपळूण स्थानकावर व्हेज फास्ट-फूड स्टॉल व टी स्टॉल तसेच खेड स्थानकावर टी स्टॉल चालविण्यासाठी नऊ वर्षांच्या कालावधीसाठी खुली निविदा मागवित आहेत. चिपळूण स्थानकावरील फास्ट-फूड स्टॉल व टी स्टॉल – स्थानकाच्या पश्चिम बाजूस सबवे जवळ (पीएफ-3 जवळ) सर्क्युलेटिंग एरियामध्ये. खेड स्थानकावरील टी स्टॉल – प्लॅटफॉर्म क्र. 01 वर ट्रेन बोगी पोझिशन क्रमांक 15-16 किंवा 18-19 दरम्यान. **निविदा क्र.: केआर/आरटीएम/आरएन/सीओएमएल/व्हेज एफएफएस-टीएस-सीएचआय-टीएस-खेड. दिनांक:- 16/03/2026. निविदा बंद होण्याची दिनांक व वेळ :** 16/04/2026 रोजी 11:00 वाजेपर्यंत. **निविदा उघडण्याची वेळ :** 16/04/2026 रोजी 11:30 वाजता. निविदा कागदपत्रे फक्त www.ireps.gov.in या संकेतस्थळावर निविदादाराची नोंदणी केल्यानंतरच उपलब्ध होतील.


## जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली सामाईक मिळकत हि त्या मिळकतीचे विद्यमान मालक सौ. अंजली अरविंद मयेकर, राहणार मु. थळ, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडुन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

तरी सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पुढील ७ (सात) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन व उपविभाग क्र | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|
| मान तर्फे झिराड, ता. अलिबाग | ६६/१/१/४ | ०-३८-२०<br>पो.ख. ०-०३-००<br>एकुण क्षेत्र ०-४१-२० | ८.८५ |

वर नमुद मिळकतीपैकी पश्चिम दिशेकडील क्षेत्र ०-१६-०० हे. आर. ही मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

अलिबाग,
दिनांक- १७/०३/२०२६

सही/-
**ॲड. पुनम अजित म्हात्रे**
जिल्हा न्यायालय - रायगड,
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबाईल नं ९७६४२१४०१०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे कावीर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. ४५४/१, एकूण क्षेत्र ०-५०-९० हे.आर; आकार ७.०६ रू. पैसे या मिळकतीपैकी क्षेत्र ०-१६-१० हे.आर;आकार २.६९ रू. पैसे ही मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. आशिष अशोक भगत रा. बी. ४०, पौंड रोड, भुसारी कॉलनी, कोथरूड, पुणे ४११०३८ यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १७/०३/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमृद वर्णनाची बागायत मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक सुशिला श्रीधर सहस्त्रबुध्दे, उल्हास श्रीधर सहस्त्रबुध्दे, विश्वास श्रीधर सहस्त्रबुध्दे, मृणाल अरविंद कानडे, वासुदेव श्रीधर सहस्त्रबुध्दे, सुनिता नारायण सहस्त्रबुध्दे, प्रशांत नारायण सहस्त्रबुध्दे, श्रिया संदिप लिमये, निर्मला जनार्दन सहस्त्रबुध्दे, विना वसंत काळे, विनया शंतनू मराठे, गिता प्रकाश वैद्य यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन नं. | क्षेत्र - (आर.चौ.मी) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड | १०४६ | ०-३७-२०<br>पो.ख. ०-०१-५०<br>०-३८-७० | ११.३१ |

अलिबाग,
दि. १७/०३/२०२६

**ॲड. महेश सुहास म्हात्रे**
ADVOCATE
ENROLLMENT No. MAH/5773/2006
Rituraj Plaza, Ground Floor,
Flat No 1. Ch. Shivaji Chouk
Near Gawade Optics
Alibag-Raigad

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे शहापुर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्व्हे नंबर ७७/१/अ/१, क्षेत्र ०-२६-१० हे. आर., पो.ख. ०-०१-८० हे. आर. एकूण क्षेत्र ०-२७-९० हे. आर., आकार ३.४१ रू. पै, ही जमीन मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. चकोर अरविंद कर्पे रा. खांदा कॉलनी, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १७/०३/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

दि. १७/०३/२०२६

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक सुनंदा गिरधर पाटील यांचेसोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| रावेत ता. अलिबाग | २८ | ०-११-२०<br>पो.ख ०-०१-५०<br>एकुण ०-१२-७० | १.२७ |

वर वर्णन केलेली मिळकत या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. पेझारी पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा.नं. ९२७३२७३८४३

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी मौजे मांडवे तर्फ बामणगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाचे मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| मांडवे तर्फे बामणगाव ता. अलिबाग | ७३ | जिरायत ०-२१-००<br>पो.ख. क्षेत्र ०-०२-९०<br>एकुण क्षेत्र ०-२३-९० | ५.४१ |

वर वर्णन जमिन मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत ही विद्यमान मालक भरत हरिश्चंद्र घरत आणि प्रमोद हरिश्चंद्र घरत यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्धद झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्वावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे

ठिकाण- अलिबाग
दिनांक १७/०३/२०२६
मोबा. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
लक्ष्मी नारायण, पहिला मजला,
गाळा नं. ७ व ८, ब्राम्हण आळी, राम मंदिर
समोर, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१

## जाहीर सूचना

सर्व हितसंबंधित व्यक्तींना कळविण्यात येते की, राष्ट्रीय महामार्ग क्र. १६० फ चे रुंदीकरण करण्यासाठी महाड तालुक्यातील मौजे रायगडवाडी, कोझरे व वरडोली या गावातील जमिनी संपादित होत आहे. त्याबाबत राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे कलम ३A अधिसूचना हिंदी व इंग्रजीमध्ये भारत राजपत्रात दिनांक ११-०३-२०२६ रोजी प्रसिद्ध झालेली आहे. या अधिसूचनेवर हरकती असल्यास अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसाच्या आत सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी महाड विभाग महाड यांचे कार्यालयात दाखल कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

स्थळ : महाड
दिनांक :- १६-०३-२०२६

**सही/-**
**(पोपट ओमासे)**
**सक्षम प्राधिकारी**
**तथा उपविभागीय अधिकारी**
**महाड उपविभागीय महाड**

रजिस्ट्री सं. डी.एल.- 33004/99 — REGD. No. D. L.-33004/99

# भारत का राजपत्र
# The Gazette of India

सत्यमेव जयते

सी.जी.-डी.एल.-अ.-11032026-270847
CG-DL-E-11032026-270847

असाधारण
EXTRAORDINARY
भाग II—खण्ड 3—उप-खण्ड (ii)
PART II—Section 3—Sub-section (ii)
प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं. 1217] नई दिल्ली, बुधवार, मार्च 11, 2026/फाल्गुन 20, 1947
No. 1217] NEW DELHI, WEDNESDAY, MARCH 11, 2026/PHALGUNA 20, 1947

### सड़क परिवहन और राजमार्ग मंत्रालय
### अधिसूचना

नई दिल्ली, 11 मार्च, 2026

**का.आ. 1274(अ).—** केन्द्रीय सरकार, राष्ट्रीय राजमार्ग अधिनियम १९५६ (१९५६ का ४८) (जिसे इसमें इसके पश्चात् उक्त अधिनियम कहा गया है) की धारा ३ क की उप-धारा (१ ) द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए, यह समाधान हो जाने के पश्चात् कि **महाराष्ट्र राज्य के रायगड जिले में राष्ट्रीय राजमार्ग संख्या १६६ एफ कि.मी. के ० से कि.मी. २३.४४७ (महाड - पाचाड – रायगड रस्ता ) तक के भूखंड का निर्माण (चौडा करणे / दो /चार लेन का बनाने आदि)** अनुरक्षण, प्रबंधन और प्रचालन के लोक प्रयोजन के लिए वह भूमि अपेक्षित है जिसका संक्षिप्त वर्णन नीचे अनुसूची में दिया गया है, ऐसी भूमि का अर्जन करने के अपने आशय की घोषणा करती है।

कोई भी व्यक्ति, जो भूमि में हितबद्ध है, उक्त अधिनियम की धारा ३ ग की उप-धारा (१ ) के अधीन पूर्वोक्त प्रयोजन के लिए ऐसी भूमि के उपयोग पर राजपत्र में इस अधिसूचना के प्रकाशन की तारीख से इक्कीस दिन के भीतर अपनी आपत्ति प्रकट कर सकेगा।

ऐसी प्रत्येक आक्षेप सक्षम प्राधिकारी, तथा **उपविभागीय अधिकारी , महाड** को लिखित रूप में किया जायगा और उसमें उसके आधार अधिकथित किए जाएंगे और सक्षम प्राधिकारी, आपत्तिकर्ता को व्यक्तिगत रूप में या किसी विधि व्यवसायी द्वारा सुने जाने का अवसर देगा और ऐसी आक्षेपो की सुनवाई के पश्चात् तथा ऐसी और जाँच करने के पश्चात्, यदि कोई हो, जिसे सक्षम प्राधिकारी आवश्यक समझे, आदेश द्वारा या तो आपत्तियों को अनुज्ञात कर सकेगा या अननुज्ञात कर सकेगा।

उक्त अधिनियम की धारा ३ ग की उप-धारा (२ ) के अधीन सक्षम प्राधिकारी द्वारा किया गया कोई भी आदेश अंतिम होगा।

इस अधिसूचना के अंतर्गत आने वाली भूमि के रेखांक और अन्य ब्यौरे सक्षम प्राधिकारी के उक्त कार्यालय में उपलब्ध हैं और उनका हितबद्ध व्यक्तियों द्वारा निरीक्षण किया जा सकता है।

**अनुसूची**

**महाराष्ट्र राज्य के रायगड जिले में राष्ट्रीय राजमार्ग संख्या १६६ एफ के कि.मी. ० से कि.मी. २३.४४७ (महाड - पाचाड – रायगड रस्ता ) के लिए अर्जन की जाने वाली संरचना रहित अथवा संरचना सहित भूमि का संक्षिप्त विवरण।**

| राज्य का नाम: महाराष्ट्र | | | जिले का नाम: रायगड | | |
|---|---|---|---|---|---|
| क्रमिक संख्या | सर्वेक्षण संख्या | भूमि का प्रकार | भूमि की प्रकृति | भूमि का क्षेत्रफल (स्थानीय इकाई) | भूमि का क्षेत्रफल (हेक्टेयर) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| तालुक का नाम: महाड | | | | | |
| गांव का नाम: घेराकिल्ला रायगड (रायगडवाडी) | | | | | |
| 1 | 71/2A 71/2B /1 71/2B/2 | निजी | शुष्क | 0.791 (हेक्टेयर ) | 0.791 |
| 2 | 71/5 | निजी | शुष्क | 0.1887 (हेक्टेयर ) | 0.1887 |
| 3 | 78/1A | निजी | नम | 0.6275 (हेक्टेयर ) | 0.6275 |
| 4 | 78/1B | निजी | नम | 0.2725 (हेक्टेयर ) | 0.2725 |
| 5 | 78/2B/1 78/2B/2 | निजी | नम | 0.017 (हेक्टेयर ) | 0.017 |
| गांव का नाम: कोंझर | | | | | |
| 6 | 77/17A 77/17B | निजी | शुष्क | 0.37 (हेक्टेयर ) | 0.37 |
| गांव का नाम: वरंडोली | | | | | |
| 7 | 182/B/1 | निजी | शुष्क | 0.0375 (हेक्टेयर ) | 0.0375 |
| | | | | Total | 2.3042 |

[फा. सं. RW/NH-12014/152/2017-MAH-Zone IV/3A]

शेख अमीनखान, निदेशक

### MINISTRY OF ROAD TRANSPORT AND HIGHWAYS
### NOTIFICATION

New Delhi, the 11th March, 2026

**S.O. 1274(E).**—In exercise of powers conferred by sub-section (1) of section 3A of the National Highways Act,1956 (48 of 1956) (hereinafter referred to as the said Act), the Central Government, after being satisfied that for the public purpose, the land, the brief description of which is given in the Schedule below, is required **for Building (widening two/ four/ laning etc.)of maintenance, management and operation on National Highway No. 166 F in the stretch of land from Km. 0 to Km. 23.447 (Mahad- Pachad- Raigad Road) in the District of Raigad in the state of Maharashtra,** hereby declares its intention to acquire such land.

Any person interested in the said land may, within twenty-one days from the date of publication of this notification in the Official Gazette, raise objections to the use of such land for the aforesaid purpose under sub-section(1) of section 3C of the said Act.

Every such objection shall be made to the Competent Authority, namely, the **Sub Divisional Officer , Mahad ,** in the State of Maharashtra, in writing and shall set out the grounds there of and the Competent Authority shall give the objector an opportunity of being heard, either in person or by a legal practitioner, and may, after hearing all such objections and after making such further enquiry, if any, as the Competent Authority thinks necessary, by order, either Allow or disallow the objections.

Any order made by the Competent Authority under sub-section (2) of section 3C of the said Act shall be final.

The land plans and other details of the land to be covered under their notification are available and can be inspected by the interested person at the aforesaid office of the Competent Authority.

**SCHEDULE**

**Brief description of the land to be acquired, with or without structure falling on National Highway No. 166 F in the stretch of land from Km. 0 to Km. 23.447 (Mahad- Pachad- Raigad Road ) in the District of Raigad in the state of Maharashtra .**

| State: MAHARASHTRA | | | District: RAIGAD | | |
|---|---|---|---|---|---|
| Sl. No. | Survey/Plot Number | Type of Land | Nature of Land | Area (in Local Unit) | Area (in Hectares) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| Taluk: Mahad | | | | | |
| Village: Gherakilla Raigad (Raigadwadi) | | | | | |
| 1 | 71/2A 71/2B /1 71/2B/2 | Private | Dry | 0.791 (Hectare ) | 0.791 |
| 2 | 71/5 | Private | Dry | 0.1887 (Hectare ) | 0.1887 |
| 3 | 78/1A | Private | Wet | 0.6275 (Hectare ) | 0.6275 |
| 4 | 78/1B | Private | Wet | 0.2725 (Hectare ) | 0.2725 |
| 5 | 78/2B/1 78/2B/2 | Private | Wet | 0.017 (Hectare ) | 0.017 |
| Village: Konzhar | | | | | |
| 6 | 77/17A 77/17B | Private | Dry | 0.37 (Hectare ) | 0.37 |
| Village: Warandoli | | | | | |
| 7 | 182/B/1 | Private | Dry | 0.0375 (Hectare ) | 0.0375 |
| | | | | Total | 2.3042 |

[F. No. RW/NH-12014/152/2017-MAH-Zone IV/3A]

SHAIKH AMINKHAN, Director

क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/४१८/३७०/२०२६

## निवडक

### गुढीपाडव्याला कबड्डीचा थरार

**पाली/गोमाशी** : सुधागड तालुका स्पोर्ट्स असोसिएशनच्या मान्यतेने सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ, डोंबिवली-कल्याण यांच्यावतीने भव्य तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन गुढीपाडव्यानिमित्त शिवाई बालक विद्या मंदिर, डोंबिवली पूर्व येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी विविध क्षेत्रातील मान्यवर, खेळाडू, क्रीडाप्रेमी, सुधागड वासीय नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेत सुधागड तालुक्यातील नामवंत संघ सहभागी होणार आहेत.कामानिमित्त डोंबिवली कल्याण या शहरात वास्तव्यास असणारे सुधागड तालुका रहिवासी सेवा संघाचे सर्व पदाधिकारी यांनी या क्रीडा महोत्सवाचे आयोजन करून ही स्पर्धा म्हणजे सुधागड वासींयाना एक पर्वणी असणार आहे. प्रोत्साहनार्थ पंचक्रोशी दिघेवाडी नांदगाव विरुद्ध शिवकन्या पाली हा महिलांचा विशेष सामन्याचे आयोजन करण्यात आले आहे.या स्पर्धेसाठी प्रथम क्रमांक २१ हजार, द्वितीय क्रमांक १५ हजार, तृतीय क्रमांक १० हजार, चतुर्थ क्रमांक १० हजार तसेच नंबर पात्र संघासाठी आकर्षक चषक देऊन गौरविण्यात येणार आहे.या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू सायकल, उत्कृष्ट चढाई, उत्कृष्ट पक्कड,पब्लिक हिरो यांना आकर्षक चषक देण्यात येणार आहे.

### चेल्सीवर ९२ कोटींचा दंड

**नवी दिल्ली** : प्रीमियर लीगने चेल्सी फुटबॉल क्लबवर आर्थिक नियमांच्या उल्लंघनाप्रकरणी ९२ कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे.क्लबवर एका वर्षाची ट्रान्सफर बंदी घालण्यात आली आहे, परंतु ती दोन वर्षांसाठी पुढे ढकलण्यात आली आहे. ही कारवाई २०११ ते २०१८ दरम्यान केलेल्या गुप्त देयकांबाबत करण्यात आली आहे. क्लबने ईडन हॅझार्ड, विलियन आणि डेव्हिड लुईझ यांसारख्या मोठ्या खेळाडूंना करारबद्ध करण्यासाठी अनरजिस्टर्ड एजंटना कोट्यवधी रुपये दिले होते. ही संपूर्ण गडबड त्यावेळची आहे, जेव्हा क्लबचे मालक रशियन अब्जाधीश रोमन अब्रामोविच होते. २०२२ मध्ये जेव्हा मब्लूकोफग्रुपने क्लब विकत घेतला, तेव्हा त्यांना खात्यांच्या तपासणीदरम्यान या गुप्त देयकांबद्दल माहिती मिळाली. नवीन व्यवस्थापनाने स्वतःहून पुढे येऊन प्रीमियर लीगला या उल्लंघनांची माहिती दिली. तपासणीत असे समोर आले की, क्लबशी संबंधित तिसऱ्या पक्षाद्वारे खेळाडू, नोंदणी नसलेले एजंट आणि इतर लोकांना गुप्त देयके दिली गेली होती. या देयकांची माहिती त्यावेळी फुटबॉल अथॉरिटीला दिली गेली नव्हती, जे नियमांच्या विरोधात आहे. प्रीमियर लीगनुसार, ही देयके चेल्सीच्या हितासाठी केली गेली होती आणि ती क्लबचा खर्च म्हणून दाखवली जायला हवी होती. क्लबने हे देखील मान्य केले की, ही देयके लपवणे आणि योग्य माहिती न देणे हे नियमांचे उल्लंघन आहे.तथापि, तपासणीनंतर हे स्पष्ट झाले की, जर ही देयके योग्यरित्या समाविष्ट केली असती, तरीही चेल्सीने नियमांचे उल्लंघन केले नसते. जर क्लबने स्वतःहून याची माहिती दिली नसती, तर त्यांच्यावर आणखी कठोर कारवाई होऊ शकली असती आणि त्यांचे गुण देखील कापले गेले असते.

# पाच दिग्गजांना निवृत्तीचे वेध



## धोनीसह मराठमोळ्या खेळाडूचाही समावेश

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भारतीय संघाचा वेगवान गोलंदाज ईशांत शर्माने आयपीएलमध्ये एकूण सात संघाकडून प्रतिनिधित्व केले आहे. ईशांतचे आतंर राष्ट्रीय करियर जवळपास संपले आहे. २०२१ पासून तो टीमच्या बाहेर असून आता युवा गोलंदाजांच्या स्पर्धेत तो यंदा आयपीएल खेळणं थांबवू शकतो. ईशांत आता गुजरात टायटन्स संघामध्ये असून त्याचे वय ३७ आहे. भारताकडून त्याने १०५ कसोटी सामन्यांमध्ये ३११ विकेट घेतल्या आहेत. भारताच्या अनेक ऐतिहासिक विजयाचाही तो साक्षीदार राहिला आहे.

मराठमोळा खेळाडू अजिंक्य रहाणेसुद्धा या यादीमध्ये असू शकतो. आयपीएलच्या पहिल्या सीझनपासून खेळणाऱ्या अजिंक्यने १९८ आयपीएल सामन्यांमध्ये १२५.०२ च्या स्ट्राईक रेटने ५०३२ धावा केल्या आहेत. १०५ ही त्याची सर्वोच्च धावसंख्या राहिली आहे. २०२३ मध्ये चेन्नईकडून खेळताना त्याने दमदार कमबॅक केले होते, गेल्या म्हणजेच २०२५ साली त्याच्याकडे कोलकाता नाईट रायडर्स संघाचे कर्णधारपद सोपवण्यात आले होते. पण काही खास कामगिरी करता आली नाही. त्यावेळी पॉइंट टेबलमध्ये संघ आठव्या स्थानावर राहिला होता. त्यामुळे ३८ वर्षीय रहाणेचाही हा शेवटचा सीझन असू शकतो.

परदेशी खेळाडूंमधील वेस्ट इंडिज संघाचा ऑल राऊंडर खेळाडू सुनील नरेनचा हा अखेरचा सीझन असू शकतो. आयपीएलमध्ये नरेन याने १९२ विकेट आपल्या नावावर केल्या असून १७८० धावा केल्यात. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून त्याने निवृत्ती घेतली आहे. चौथा खेळाडू म्हणजे ऑस्ट्रेलियाचा मिचेल स्टार्क असून कोलकाता संघासाठी २०२४ च्या विजेतेपदामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली होती. याआधीच स्टार्कने टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली असल्याने ३६ वर्षीय स्टार्कही आयपीएल खेळायचे थांबवू शकतो.

पाचवा खेळाडू महेंद्रसिंग धोनी असून सीएसकेमध्ये संजू सॅमसन याला संघात घेतल्याने माहीचा शेवटचा सीझन असल्याचं बोललं जात आहे. २५ वर्षाचा धोनी प्रत्येक आयपीएल सीझनमध्ये आता निवृत्त होणार अशी चर्चा होते पण तो संघात कायम असून खेळतोच यंदाही तो खेळणार असल्याचे सीएसकेच्या सीईओंनी सांगितले होते.त्यामुळे धोनी आयपीएल सीझन खेळून थांबण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

## पाचवी फेडरेशन कप कबड्डी स्पर्धा

# महाराष्ट्राचे संघ जाहीर

### आकाश शिंदे, समरीन बुरोंडकर यांच्याकडे नेतृत्व

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.ने ५व्या वरिष्ठ गट कबड्डी स्पर्धेकरिता आपले दोन्ही संघ जाहीर केले. संता, मध्य प्रदेश येथे १९ ते २२ मार्च २०२६ या कालावधित ही स्पर्धा खेळविण्यात येईल. नाशिकच्या आकाश शिंदे कडे पुरुष संघाचे, तर रत्नागिरीच्या सिम रन बुरोंडकर कडे महिला संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपविण्यात आली. या दोन्ही संघाना स्पर्धेकरिता शुभेच्छा देण्याचा कार्यक्रम १६ म ार्च रोजी डोंबिवली येथे आयोजित करण्यात आला होता. निवडण्यात आलेला हा संघ आज १७ मार्च रोजी दुपारी ०१-३० वा. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनन्स येथून स्पर्धे करिता रवाना झाला. अशी माहिती व संघाची घोषणा राज्य कबड्डी संघटनेचे सचिव माधव गायकवाड यांनी सर्व प्रसार माध्यमाकरिता केली.





पुरुष संघामध्ये आकाश शिंदे संघनायक, नाशिक, सुरज दूंदले ठाणे, आकाश अरसूल मुं. उपनगर, सौरभ राऊत अ. नगर, संकेत सावंत मुंबई शहर, सुरेश जाधव पुणे, साईप्रसाद पाटील कोल्हापूर, अजित चौहान पुणे,आदित्य शशिकांत शिंदे रत्नागिरी, आदित्य पोवार कोल्हापूर, अनुज गावडे पुणे, सौरभ फागरे कोल्हापूर, साहिल राणे मुंबई शहर, अभिषेक गुंगे सांगली. प्रशिक्षक निलेश शिंदे, मुंबई उपनगर व्यवस्थापक भगीरथ पाटील, ठाणे यांचा समावेश आहे.

महिला संघामध्ये समरीन बुरोंडकर, संघनायिका रत्नागिरी, माधुरी गवंडी ठाणे, कोमल देवकर मुंबई उपनगर,तसनिम बुरोंडकर रत्नागिरी, शुभदा खोत मुंबई उपनगर, आम्रपाली गलांडे पुणे, प्रतिक्षा तांडेल मुंबई शहर, हर्षा शेट्टी पुणे, याशिका पुजारी मुंबई उपनगर, समृद्धी मोहिते मुंबई उपनगर, निकिता पडवळ पुणे, प्रणाली नागदेवता मुंबई उपनगर, संजना भोईर पालघर, साक्षी सावंत मुंबई शहर. प्रशिक्षिका मेघाली म्हसकर व्यवस्थापिका अश्विनी ईश्वलकर यांचा समावेश आहे.

# शिवशंकर, मोरया, जय बजरंग संघ उपांत्य फेरीत

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

शिवशंकर, जय बजरंग-वाशिंद, मोरया क्रीडा, जय हनुमान-काल्हेर यांनी ठाणे जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी खासदार चषक कबड्डी स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक दिली.

प्रथम श्रेणी पुरुषांच्या उपांत्यापूर्व फेरीत कल्याणच्या शिवशंकर मंडळाने विजय क्रीडा मंडळाचा प्रतिकार ४१-३१ असा मोडून काढत उपांत्य फेरी गाठली. पूर्वार्धात लोण देत २३-१६ अशी आघाडी घेणाऱ्या शिवशंकरने उत्तरार्धात आणखी एक लोण देत १० गुणांच्या फरकाने सामना आपल्या नावे केला. इतर तिन्ही सामने तसे एकतर्फीच झाले.

दुसऱ्या सामन्यात जय बजरंग-वाशिंद संघाने श्री समर्थ मंडळावर ४१-१९ अशी सहज मात केली. आक्रमक खेळ करीत जय बजरंगने पहिल्या डावात २ लोण देत २५-०८ अशी आघाडी घेत आपला विजयाचा पाया रचला. दुसऱ्या डावात सावध खेळ करीत विजयावर शिक्कामोर्तब केले. मोरया मंडळाने जय बजरंग-खारेगाव संघाचा ५०-२४ असा पाडाव करीत उपांत्या फेरी गाठली. विश्रांतीपर्यंत ३ लोण देत ३०-१० अशी आघाडी घेत मोरयाने आपला विजय आधीच निश्चित केला होता. विश्रांतीनंतर औपचारिकता पूर्ण करीत आणखी एक लोण देत सामना आपल्या खिशात टाकला. शेवटच्या सामन्यात जय हनुमान-काल्हेर संघाने हुतात्मा शांतराम संघावर ३७-०८ असा सहज विजय मिळविला.




कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)